# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२१

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### पुणे येथील दिनानाथ मंगेशकर रुग्णालयात सवलतीच्या दरात वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देत नसल्याबाबत

**(१) २६ (१६-०३-२०२०). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील दिनानाथ मंगेशकर रुग्णालय सवलतीच्या दरात वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याच्या कराराची अंमलबजावणी करत नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी आयुक्त, पुणे यांनी रुग्णालय प्रशासनास नोटीस बजावली असून कमीत कमी दरात वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याचा करार दीनानथ मंगेशकर रुग्णालयाने मोडला असल्याची तक्रार श्री.रमेश धर्मावत यांनी दाखल केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी रुग्णालय प्रशासन शासनाची फसवणूक आणि गरिबांची आर्थिक लूट करीत असतांना शासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (०२-१२-२०२१) :** (१) व (२) श्री.रमेश धर्मावत यांचा अशा आशयाचा दिनांक १५/०१/२०१९ रोजीचा अर्ज जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांच्याकडे अर्ज प्राप्त झाला आहे. या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांनी दिनांक १९/०३/२०१९ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजाविली आहे.

(३) या प्रकरणी जमिन वाटप आदेशानुसार प्रतिग्रहिता संस्थेचा खुलासा विचारात घेऊन वाटप आदेशातील अटी शर्तीचा भंग झाला किंवा कसे याबाबत नियमोचित कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, पुणे यांना देण्यात आले आहेत, अशी वस्तुस्थिती आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## उरण (जि.रायगड) तालुक्यातील पोलीस वसाहतीची दुरवस्था झाल्याबाबत

**(२) २७१ (२२-०३-२०२०). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) तालुक्यातील पोलीस वसाहतीतील अस्वच्छतेमुळे कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी कर्तव्य बजावणाऱ्या पोलीस कुटुंबियांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वसाहतीतील वाढलेल्या झाडाझुडपांमध्ये विषारी सापांचे वाढते प्रमाण तसेच शौचालयाच्या सेफ्टी टँकमधून घाणीचे पाणी रस्त्यावर पसरून सर्वत्र पसरलेल्या दुर्गंधीमुळे येथे वास्तव्य करीत असलेल्या १५ पोलीस कुटुंबियांपैकी अनेक कुटुंबे दुसऱ्या ठिकाणी राहण्यास गेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणाऱ्या पोलीस कुटुंबियांना सुसज्ज घरे देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच कार्यवाहीचे स्वरूप काय आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१५-१२-२०२१) :** (१) व (२) सदर पोलीस वसाहत सन २००५ मध्ये बांधण्यात आलेली असून उक्त प्रकल्पातील १२४ सेवा निवासस्थानांपैकी १०४ सेवा निवासस्थाने रिक्त आहेत. उक्त सेवा निवासस्थाने सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पी.आर.बी. वर घेण्यात आलेली नसल्याने वसाहत बांधल्यानंतर दुरुस्ती झालेली नसल्याने सदनिकांची दुरावस्था झाली आहे.

(३) पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांच्या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी / कर्मचारी यांच्याकरिता म्हातावली व नागाव, उरण, नवी मुंबई येथे बांधण्यात आलेल्या निवासस्थानांच्या दुरुस्तीवरील प्रस्तावाबाबत करावयाची कार्यवाही विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे शहरातील महागिरी जवळील जरीमरी पोलीस वसाहतीतील इमारतींच्या पुनर्विकासाबाबत

**(३) १४२१ (२२-०३-२०२०). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील महागिरी जवळील जरीमरी पोलीस वसाहतीतील इमारतींच्या खोल्यांमधील छतातून पावसाळ्यात गळनारे पाणी व उक्त इमारती मोडकळीस येऊन जीर्ण झाल्याने भिंती, जुनाट वासे, व कुवट वास यामुळे त्रस्त झालेल्या नागरीकांनी राज्याचे मा.गृहमंत्री यांनी वसाहतीला भेट दिली असतांना याप्रकरणी निवेदने दिली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वसाहत ब्रिटीशकालीन असल्यामुळे वसाहतीतील इमारतीची पुनर्बांधणी करावी अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१५-१२-२०२१) :** (१) व (२) होय.
गृहमंत्र्यांनी प्रश्नाधीन ठिकाणी भेट दिली होती. त्यावेळी नागरिकांनी तोंडी निवेदने / मागण्या केल्या आहेत.
(३) पोलीस आयुक्त ठाणे शहर येथे मुख्यालयाजवळील जरीमरी पोलीस इमारतीच्या समोरील बैठी चाळ तोडून, त्या ठिकाणी नवीन ३१६ निवासस्थाने असलेली इमारत बांधण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधिन आहे.

---

## कोळवद ता. यावल कोळवद-आसराबारी रस्ता १/०० ते २/०० चे सन २०१८-१९ मध्ये पंतप्रधान ग्रामसडक योजनेतून केलेल्या कामात झालेला गैरव्यवहार

**(४) २०९० (१५-०४-२०२०). श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोळवद (ता. यावल) कोळवद-आसराबारी रस्ता १/०० ते २/०० चे सन २०१८-१९ मध्ये पंतप्रधान ग्रामसडक योजनेतून डांबरीकरण झालेले असून त्याच रस्त्यावर खडी नुतनीकरण (ग्रामा-२०) न करता ठेकेदाराने बिले घेतल्याच्या तक्रारीने माहे जून, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान उघडकीस आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एकाच आर्थिक वर्षात पंतप्रधान ग्राम सडक योजनेतून झालेल्या डांबरीकरण रस्त्यावर पुन्हा खडी नुतनीकरण करता येते काय,
(३) असल्यास, सदर या प्रकरणी ठेकेदार व अधिकाऱ्यांवर चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने दोषींवर कारवाई करण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१५-१२-२०२१) :** (१), (२) व (३) जळगाव जिल्हयातील यावल तालुक्यातील सातोद कोळवद ते आसराबारी रस्ता, रस्ते विकास योजना २००१-२०२१ नुसार ग्रामीण मार्ग ८८ आहे. सन २०१५-१६ मध्ये तत्कालीन सदर रस्ता खडी पृष्ठभागाचा होता व सदर रस्ता काळ्या मातीतून व बागायती क्षेत्रातून जात असल्याने तसेच सदर रस्त्यावरील केळी व ऊसाच्या वाहतूकीमुळे रस्त्याच्या पृष्ठभागावर खड्डे पडल्याने वाहतूक सुरळीत होण्यासाठी किमी १/०० ते २/०० या लांबीचे खडीनुतनीकरणाचे कामास जिल्हा परिषद, जळगाव यांनी दिनांक ०६ फेब्रुवारी, २०१६ अन्वये कार्यारंभ आदेश देऊन सदरचे काम दिनांक १३ मार्च, २०१६ अखेर पुर्ण करण्यात आले होते.

तद्नंतर मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत ग्राम विकास विभागाच्या दिनांक २८ सप्टेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये जळगाव जिल्ह्यातील रामा-०४ सांगवी बु. सातोड ते आसरबारी रस्ता, ता.यावल या रस्त्याच्या ११.८५ कि.मी. लांबीच्या रस्ते दर्जोन्नतीस प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर दिनांक १६ मार्च, २०१७ रोजी या कामास कार्यारंभ आदेश देवून दिनांक २४ जानेवारी, २०१८ रोजी सदर काम पूर्ण करण्यात आले आहे.

कोळवद ते आसराबारी रस्ता कि.मी. १/०० ते २/०० ही लांबी मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत मंजुर लांबीचाच भाग आहे. कोळवद ते आसराबारी रस्ता कि.मी. १/०० ते २/०० या लांबीत जिल्हा परिषदेकडून मार्च, २०१६ मध्ये खडी नुतनीकरण झाल्यानंतर एक वर्षानंतर सदर रस्त्याच्या दर्जोन्नतीच्या कामास सुरूवात झाली. त्यामुळे सदर डांबरीकरण झालेल्या लांबीतील रस्त्यावर पुन:श्च खडी नुतनीकरणाचे काम करण्यात आलेले नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागादेवी येथे सन २००७ रोजी लोकसहभागातून बांधलेल्या पत्राच्या शेडलाच खुला सभा मंडप दाखवून ठेकेदाराने केलेला गैरव्वहार**

**(५) २०९६ (१५-०४-२०२०). श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागादेवी, (ता.यावल, जि.जळगांव) येथे सन २००७ रोजी लोकसहभागातून बांधलेल्या पत्राच्या सभा मंडपालाच ठेकेदाराने नागादेवी मंदीर देवस्थान येथे खुला सभा मंडप दाखवून ठेकेदाराने अधिकाऱ्यांच्या संगमताने लाखो रूपयांची बिले घेतल्याची लेखी तक्रार ग्रामपंचायत कार्यालय, सावखेडा सीम यांनी दिनांक ३० मे, २०१८ रोजी कार्यकारी अभियंता जि.प. बांधकाम विभाग यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (१५-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी उप अभियंता आणि शाखा अभियंता, जिल्हा परिषद उप विभाग, रावेर, जि.प. जळगांव यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी व पंचानामा केला असून सदरचे काम लोकसहभागातून झालेले नसून शासन निधीतून झालेले आहे, त्यामुळे तक्रारीत कोणतेही तथ्य आढळून आलेले नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात आपले सरकार सेवा केंद्राकडून पूर्ण सेवा मिळत नसल्याबाबत**

**(६) २५२० (२४-०७-२०२०). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात २७ हजारांपेक्षा जास्त ग्रामपंचायतीमध्ये ग्रामविकास विभागाच्या दिनांक १९ ऑगस्ट, २०१६ च्या शासन निर्णयाप्रमाणे आपले सरकार सेवा केंद्र सुरु असून ते चालविण्यासाठी ग्रामपंचायतील दरमहा १२ हजार ५०० रुपये एका खाजगी कंपनीला दयावे लागतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सेवा केंद्रामार्फत फक्त जन्म-मृत्यू, मालमत्ता आकारणी, फेरफार ही तीनच प्रमाणपत्रे उपलब्ध होत असून सन २०१६ ते २०२० सालापर्यंत ही सेवा केंद्रे चालविण्यासाठी राज्यातील ग्रामपंचायतींना खाजगी कंपनीला दरमहा २० हजार कोटी रुपयांपेक्षा ही जास्त रक्कम द्यावी लागली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात किती ग्रामपंचातीसाठी आपले सरकार सेवा केंद्र स्थापन केले असून, उस्मानाबाद जिल्हयात अशा स्थापन व कार्यरत असलेल्या आपले सरकार सेवा केंद्राची आकडेवारी किती असून, सदरहू सेवा केंद्रात एकूण किती ऑपरेटर कार्यरत आहेत याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, सदर जिल्हयातील आपले सरकार सेवा केंद्रामार्फत दाखले/प्रमाणपत्र, सेवा दिल्याबाबत उस्मानाबाद जिल्हयातील संबंधित ग्रामपंचायतीकडे नोंद नसल्याचे, तसेच या आपले सेवा केंद्रामार्फत गेल्या पाच वर्षात दिलेल्या दाखला/प्रमाणपत्राच्या कामाची, वेतन व अन्य अनुषंगिक बाबींची चौकशी करणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(५) असल्यास, राज्यातील सेवा केंद्र बंद करुन होणारा गैरव्यवहार थांबविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (१५-१२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

ग्रामविकास विभाग, शासन निर्णय दि.११ ऑगस्ट, २०१६ अन्वये राज्यातील ग्रामपंचायतींमध्ये आपले सरकार सेवा केंद्र CSC -SPV या केंद्रशासनाद्वारे प्रेरित कंपनीच्या माध्यमातून सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

आपले सरकार सेवा केंद्र चालविण्यासाठी CSC-SPV या कंपनीला ग्रामपंचायतीकडून प्रति महिना रु.११, ४५०/- + सेवा कर इतकी रक्कम दिली जाते.

(२) सदर केंद्रांमार्फत G२C अंतर्गत ग्रामपंचायतीमार्फत देण्यात येणारे १ ते १९ दाखले नागरिकांना वितरित करणे, G२G अंतर्गत ग्रामपंचायत स्तरावरील नमुना १ ते ३३ मधील नोंदी संगणीकृत करणे व केंद्र शासनाच्या NIC मार्फत विकसित केलेल्या ११ प्रकारच्या आज्ञावलींमध्ये माहिती भरणे इ. तसेच ग्रामपंचायत प्रशासनाचे संगणकीकरण,इतर विभागांच्या ४२० पेक्षा अधिक सेवा, अस्मिता योजनेंतर्गत शाळेतील मुलींची नोंदणी, नरेगा हजेरी पट तसेच B२C अंतर्गत नागरिकांना विविध सेवा जसे रेल्वे, बस, आरक्षण, डीटीएच रिचार्ज, बँकिंग सेवा, ई-कॉमर्स, पॅनकार्ड, आधार नोंदणी, विमा हप्ते भरणे, पासपोर्ट, वीज बिल भरणे, पोस्ट विभागाच्या सेवा, मोबाईल रिचार्ज इ. सेवा पुरविण्यात येतात.

दि.११ ऑगस्ट, २०१६ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार दरमहा देय रक्कम कंपनीला अदा करण्यात येते. सदर प्रकल्पासाठी सुमारे रु.२५० कोटी इतका वार्षिक खर्च येतो.
(३) राज्यात एकूण २७८४३ ग्रामपंचायतीमध्ये २०६८० आपले सरकार सेवा केंद्र असून, उस्मानाबाद जिल्ह्यात ४७३ केंद्र कार्यान्वित आहेत व सदरहू केंद्रात एकूण ४७३ केंद्रचालक कार्यरत आहेत.
(४) ग्रामपंचायतीमार्फत देण्यात येणा-या विविध दाखले व प्रमाणपत्र बाबतच्या नोंदी उस्मानाबाद जिल्हयातील ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध आहेत, असे जिल्हा परिषद उस्मानाबाद यांनी दि.१०/११/२०२१ च्या पत्रान्वये कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयातील विविध पोलिस स्टेशन अंतर्गत प्रशासकीय इमारतीचे व निवासस्थानाचे बांधकाम करण्याबाबत**

**(७) २९४७ (२२-०३-२०२०). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्हयातील विविध पोलिस स्टेशन अंतर्गत प्रशासकीय इमारतीचे व हजर संख्याबळानुसार शासकीय निवासस्थान व बॅरेक बांधकाम करण्याबाबत (पोस्टे अमडापूर, बोराखेडी, धामणगांव बढे, धाड) सहा. पोलिस महानिरिक्षक (नि.व.स.) यांनी दि.२७.२.२०१७, २.३.२०१७, १७.५.२०१७ व १३.१२.२०१८ रोजी वा त्या सुमारास व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य, पोलिस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित वरळी मुंबई यांच्याकडे संपूर्ण माहिती विवरणपत्रात भरुन जमिनीच्या सातबारा उता-यांच्या प्रतीसह कार्यालयात सादर केल्या होत्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, कोणतीही कार्यवाही न करण्याची कारणे व वरील प्रकरणाची सद्:स्थिती काय आहे ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१०-१२-२०२१) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) व (३) बुलढाणा जिल्हयातील अमडापूर, बोराखेडी, धामणगांव बढे व धाड पोलिस स्टेशन अंतर्गत प्रशासकीय इमारतीचे व हजर संख्याबळानुसार शासकीय निवासस्थान व बॅरेक बांधकाम करण्याबाबतच्या प्रस्तावासह पोलिस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित वरळी मुंबई यांच्याकडे प्राप्त झालेल्या बांधकाम प्रस्तावांवर निधीच्या उपलब्धतेनुसार प्राधान्यक्रम ठरविण्याची कार्यवाही पोलीसमहासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालकडून सुरु आहे.

---

**यवतमाळ जिल्हा परिषदेच्या बहुतांश शाळांमध्ये शौचालय व अन्य मूलभूत सोयी-सुविधांचा अभाव असल्याबाबत**

**(८) ३३४७ (१२-०४-२०२०). श्री.नामदेव ससाने (उमरखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्हा परिषदेच्या बहुतांश शाळांमध्ये शौचालय व अन्य मूलभूत सोयी-सुविधांचा अभाव असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शाळांमध्ये तातडीने मूलभूत सोयी-सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१५-१२-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही, तथापी, सन २०२०-२१ च्या युडायस प्लस नुसार सर्व जिल्हा परिषद शाळांमध्ये शौचालय व अन्य मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात सरपंचांना ५ महिन्यापासून मानधन मिळाले नसल्याबाबत.**

**(९) ३४३५ (२४-०७-२०२०). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सरपंचांच्या मानधनात वाढ करुन थेट त्यांच्या खात्यात रक्कम जमा करुन अशी घोषणा तात्कालीन शासनाने केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या घोषणेनंतर केवळ २ महिन्याचे मानधन जमा झाले मात्र ५ महिन्यांचे मानधन अद्याप बँक खात्यात जमा न झाल्याने सरपंचांमध्ये नाराजी आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने माहिती घेवून व निधीची तरतूद करुन राज्यातील सरपंचांचे थकीत मानधन तातडीने त्यांच्या बँक खात्यात जमा करण्याबबात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१६-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे .
शासन निर्णय क्र. व्हीपीएम-२०१९ /प्र.क्र.२५५/पंरा-३ दि.३०.०७.२०१९ अन्वये, सरपंचांच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.
(२) हे खरे नाही.
सरपंचांचे मानधन राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान, पुणे यांचे मार्फत नियमितपणे त्यांचे बँक खात्यात जमा केले जाते.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील ग्रामपंचायत कर्मचा-यांच्या मागण्याबाबत**

**(१०) ३८४० (१६-०४-२०२०). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), डॉ.किरण लहामटे (अकोले) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात एकूण २७९२० ग्रामपंचायती असून त्यामध्ये सुमारे ६० हजारापेक्षा अधिक कर्मचारी कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्मचारी संघटना गेल्या २० वर्षापासून ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना नगरपरिषद वा जिल्हापरिषद कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनश्रेणी मंजूर करणे या मागणीसह अन्य मागण्यांप्रकरणी महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी युनियन शाखा, मोताळा, जि.बुलढाणा यांनी मागणी केली असून दिनांक १० जुलै २०१८ रोजी नागपूर येथे लॉग मार्च तर दिनांक ७ जानेवारी २०१९ रोजीच्या लातूर येथील अधिवेशनात देखील तशी मागणी करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यावेळी उपस्थित ग्रामविकास मंत्री व कामगार मंत्री यांनी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर शासन सकारात्मक निर्णय घेईल असे दोन्ही मंत्री महोदयांनी घोषित केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१६-१२-२०२१) :** (१) होय हे खरे आहे.

(२), (३) व (४) होय हे अंशतः खरे आहे.

राज्यातील विविध ग्रामपंचायत कर्मचारी संघटना यांचेकडून सदर कर्मचाऱ्यांना नगरपरिषद व जिल्हापरिषद कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनश्रेणी मंजूर करणेबाबतची मागणी केली जात आहे.

ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत व आकृतिबंध बाबत शिफारस करण्यासाठी अभय यावलकर, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांच्या अध्यक्षतेखाली सन २०१७ मध्ये समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीच्या अहवालाच्या आधारे सदर प्रकरणी कार्यवाहीची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील दोन गावांतील शिवे वरील रस्त्यांना दर्जोन्नत करुन रस्ते वर्गवारीत समाविष्ठ करणेबाबत**

**(११) ४३८७ (२१-०३-२०२०). श्री.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यातील दोन गावांतील शिवेवरुन जाणारे रस्ते अतिक्रमाणामुळे व त्याकडे झालेल्या दुर्लक्षामुळे नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शिव रस्त्यांची महसूल नकाशात स्पष्ट आखणी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रस्त्यांना शासकीय रस्ते आराखड्यात त्याच्या आवश्यकतेनुसार दर्जा देऊन दर्जोन्नत करणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०८-१२-२०२१) :** (१) महसूल विभागाच्या दि. १३ एप्रिल, २०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये गांव नकाशाप्रमाणे अतिक्रमित व बंद झालेले पाणंद/पांधण/पानधन/शेतरस्ते/शिवरस्ते/शिवाररस्ते मोकळे करणे- बाबतची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार सद्य:स्थितीत कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दि.२०.०७.२०१६ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार अल्प रस्त्यांचे इजिमा /राज्यमार्ग / प्रमुख जिल्हा मार्गात दर्जोन्नत करणेबाबत, तसेच योजनाबाह्य/अवर्गीकृत रस्ते हे रस्ते विकास योजनेमध्ये समाविष्ट करण्याबाबतचे निकष निश्चित करण्यात आले आहेत. त्यानुसार रस्ते दर्जोन्नत करण्याची कार्यवाही करण्यात येते. सदर परिपत्रकानुसार रस्ते दर्जोन्नतीच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना सर्व जिल्हा परिषदांना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील ग्रामपंचायत कर्मचारी यांना वेतनश्रेणी, पेन्शन, ग्रज्युएटी व राहणीमान भत्ता लागू करण्याबाबत

**(१२) ५६१८ (१०-०४-२०२०). श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामपंचायत कर्मचारी यांना वेतनश्रेणी, निवृत्तीवेतन, ग्रज्युएटी व राहणीमान भत्ता तसेच भविष्यनिर्वाह निधी ८.३३ टक्के इत्यादी मागण्यांसाठी गेल्या अनेक वर्षापासून तत्कालीन मंत्री महोदय व अधिकाऱ्यांसमवेत बैठकी घेणे, मोर्चा, आंदोलने करणे अशा अनेक सनदमार्गाने शासनाचे लक्ष वेधून घेण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने सकारात्मक निर्णय घेऊनही त्याबाबतचा शासन निर्णय अद्याप निर्गमित करण्यात आला नसल्याचे दिनांक १० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्याप शासन निर्णय निर्गमित न होण्याची कारणे काय आहेत, तसेच शासन निर्णय निर्गमित करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१५-१२-२०२१) :** (१) होय, हे अंशतः खरे आहे .

(२) नाही, हे खरे नाही .

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम ६१ नुसार, ग्रामपंचायत कर्मचारी हे शासनाचे कर्मचारी नसून संबंधित ग्रामपंचायतचे कर्मचारी आहेत. मात्र, ग्रामपंचायती या आर्थिक दृष्ट्या सक्षम नसल्याने केवळ किमान वेतन अनुदानातील राज्य शासनाचा अनुज्ञेय हिस्सा नियमितपणे त्यांच्या बँक खात्यात जमा केला जातो. सदर कर्मचारी हे शासनाचे कर्मचारी नसल्याने निवृत्तीवेतन, ग्रज्युएटी या बाबी शासनामार्फत हाताळणेचा प्रश्न उद्‌भवत नाही.

तसेच, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना राहणीमान भत्ता नियमितपणे ग्रामनिधीतून अदा करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व यांना वेळोवेळी सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील ग्रामपंचायतीकडे कार्यरत असणा-या कर्मचा-यांना पात्रतेनुसार वर्ग ३ व वर्ग ४ ची पदोन्नती व आकृतिबंधाची अट रदद करणेबाबत**

**(१३) ५९८८ (१६-०४-२०२०). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामपंचायतीकडे कार्यरत असणा-या कर्मचा-यांना पात्रतेनुसार वर्ग ३ व वर्ग ४ ची पदोन्नती देणे, आकृतिबंधाची अट रदद करुन सर्व ग्रामपंचायतींना १०० टक्के अनुदान देण्यासह मासिक १५ हजार रुपये वेतन देण्याची मागणी ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेने मा.मुख्यमंत्री व ग्रामविकास मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ग्रामपंचायत कर्मचा-यांना शासन सेवेत समावून घेण्यासही त्यांच्या विविध मागण्यांबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१६-१२-२०२१) :** (१) नाही हे खरे नाही.

(२) महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम ६१ नुसार, ग्रामपंचायत कर्मचारी हे शासनाचे कर्मचारी नसून संबंधित ग्रामपंचायत मार्फत नियुक्त कर्मचारी आहेत. सबब, त्यांना शासन सेवेत सामावून घेणेबाबत कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.

ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत व आकृतिबंध बाबत शिफारस करण्यासाठी अभय यावलकर, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांच्या अध्यक्षतेखाली सन २०१७ मध्ये समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीच्या अहवालाच्या आधारे कार्यवाहीची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्याला वस्तू व सेवा कराच्या रक्कमेतून केंद्राकडून मिळणारा उर्वरित हिस्सा**

**(१४) ६१३६ (१०-०४-२०२०). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या वस्तू व सेवा करांची कोट्यावधी रुपयांची वसूली राज्य शासनाकडून नोडल एजन्सी म्हणून केली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वस्तू व सेवा कर राज्य शासन वसूल करीत असून वसूल झालेल्या रक्कमेतून राज्यास केंद्र शासन ठरलेली रक्कम देते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र राज्याची वस्तू व सेवा करा पोटीची माहे ऑगस्ट, २०१९ ते नोव्हेंबर २०१९ पर्यंत वस्तू व सेवा कर भरपाईची पैकी मागणी केलेली रक्कम रु. ८६११.७६ कोटी पैकी रु.६७६१.१३ कोटी इतकी रक्कम प्राप्त झाली असून उर्वरित रु.१८५०.६३ कोटी/- इतकी रक्कम प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उर्वरित रक्कम तातडीने मिळावी म्हणून शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (१०-१२-२०२१) :** (१) होय.
(२) होय.
(३) महाराष्ट्र राज्याची वस्तू व सेवा करा पोटीची माहे ऑगस्ट, २०१९ ते नोव्हेंबर,२०१९ पर्यंत वस्तू व सेवा कर भरपाई पोटी मागणी केलेली रक्कम केंद्र सरकारकडून प्राप्त झाली आहे. तसेच सन २०१९-२० या आर्थिक वर्षात सुरुवातीस एकूण मागणी १९,२३३ कोटी रुपये केली होती. ती सर्वच्या सर्व केंद्राकडून प्राप्त झाली. तथापि वस्तू व सेवाकराचा केंद्र सरकारने दिलेला परतावा गृहित धरुन वस्तू व सेवा कर भरपाईची केलेली सुधारीत मागणी रु.२०,२६२ कोटी होती त्यापैकी १०२९ कोटी रुपये हे केंद्र शासनाकडे प्रलंबित आहेत.
(४) शासनस्तरावर पाठपुरावा सुरु आहे.
(५) लागू नाही.

---

**महसूल व वनविभागाच्या १ ऑगस्ट २०१९ च्या शासन निर्णयाचे पालन न करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करणेबाबत**

**(१५) ६२३९ (२७-०३-२०२०). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महसूल व वनविभागाच्या दिनांक १ ऑगस्ट, २०१९ च्या शासन निर्णयानुसार इनामी वतन जमिनीच्या शर्तभंग प्रकरणी तपासणी करून त्याअन्वये अभिलेख अद्ययावत करावयाचे असताना या प्रकारे एकाही अभिलेखाची दुरुस्ती करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याचप्रमाणे अर्ध न्यायिक प्रकरणांचा विहित कालावधीत तातडीने निपटारा करणे आवश्यक असतानाही एकाही प्रकरणाचा निपटारा यान्वये करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या कायद्यान्वये एक महिन्याच्यावर प्रलंबित असणारे फेरफार निकाली काढणे व त्याकरिता मंडळ मुख्यालयी फेरफार अदालत घेणे आवश्यक असताना महाराजस्व अभियान राबविताना फेरफार निकाली काढणेकरीता अजूनपर्यंत कधीही अदालत घेण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अशा प्रकारे शासन निर्णयाचे पालन न करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणार आहे ?

**श्री. बाळासाहेब थोरात (०१-१२-२०२१) :** (१) (२) व (३) हे खरे नाही. महसूल प्रशासन अधिक लोकाभिमूख, कार्यक्षम, गतिमान व पारदर्शक करणे यासाठी महाराजस्व अभियानाबाबतचा शासन निर्णय दिनांक ०१.०८.२०१९ अन्वये निर्गमित करण्यात आलेला आहे.

प्राप्त माहितीनुसार इनाम व वतन जमिनीच्या शर्तभंग प्रकरणांच्या तपासणीबाबतची मोहिम नियमितपणे हाती घेण्यात येते व अशा प्रकरणांच्या नियमीतीकरणाबाबत तसेच त्यानुषंगाने अभिलेख अद्ययावत करण्याबाबत प्रकरणपरत्वे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येतो.

तसेच महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ व त्याखालील नियमातील तरतुदी अन्वये विविध महसूल प्रधिकाऱ्यांकडे अर्धन्यायीक प्रकरणे दाखल झाल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीत निर्गमीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. अपवादात्मक परिस्थितीत समर्थनीय कारणे नमूद करून संबंधित नियंत्रक प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने हा कालावधी जास्तीत जास्त सहा महिन्यापर्यंत वाढविता येतो. महसूली प्राधिकाऱ्यांना अर्धन्यायिक प्रकरणे हाताळताना e-DISNIC/eqjcourts प्रणालीचा वापर अनिवार्य करण्यात आलेला आहे.

सर्व तहसिलस्तरावर एक महिन्याच्यावर प्रलंबित असलेले फेरफार निकाली काढण्यासाठी मंडळ मुख्यालयी नियमीतपणे फेरफार अदालत आयोजित करण्यात येते व यासंदर्भातील मासिक प्रगती अहवाल संबंधित विभागीय आयुक्त कार्यालयास सादर करण्यात येतो.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राळेगांव (जि. यवतमाळ) येथील सांस्कृतीक भवनाचे बांधकाम अपुर्ण अवस्थेत असल्याबाबत**

**(१६) ७४८७ (१६-०४-२०२०). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राळेगांव (जि. यवतमाळ) येथील सांस्कृतीक भवन बांधकामाकरीता सन २०१२ - १३ या वर्षा मध्ये ग्रामीण विकास विभागाकडुन विशेष निधी प्राप्त झाला होता सबंधीत विभागाच्या अधिकाऱ्यांने सदर कामाची निवीदा काढुन सांस्कृतीक भवनाचे बांधकाम चालु केले परंतू भवनाचे काम आज पर्यंत अपुर्ण असल्याचे दिनांक १ जानेवारी, २०२० च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जि.प.बांधकाम विभाग यवतमाळ यांचेकडे सांस्कृतीक भवन बांधकाम करीता निधी देण्यात आला होता बांधकाम विभागाने भवनाचे बांधकाम जोत्यापर्यंत करण्यात आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास शासनने चौकशी करुन अपुर्ण असलेले सांस्कृतीक भवनाचे बांधकाम पुर्ण करण्याकरीता निधी उपलब्ध करून बांधकाम पूर्ण करण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१५-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

राळेगांव, ता. राळेगांव येथे सांस्कृतिक भवन बांधकाम करणे या कामासाठी लेखाशीर्ष २५१५ १२३८ अंतर्गत सन २००९-१० या वर्षात रु. २०.०० लक्ष आणि सन २०१०-११ या वर्षात रु. ५१.०० लक्ष याप्रमाणे एकूण रु. ७१.०० लक्ष इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला. उपलब्ध निधीमधून सदर सांस्कृतिक भवनाचे स्लॅब पर्यंतचे काम पूर्ण करण्यात आले आहे.
(२) सदर सांस्कृतिक भवनाचे स्लॅब पर्यंतचे काम पूर्ण झाले आहे.
(३) सदर सांस्कृतिक भवनाचे उर्वरित बांधकाम पूर्ण करण्याबाबत जिल्हा परिषद बांधकाम विभाग, यवतमाळ यांनी आराखडा तयार केला असून जिल्हास्तरावर जिल्हा वार्षिक योजना व जिल्हा परिषद सेस निधी अंतर्गत निधीची मागणी केली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पोशीर (ता.कर्जत, जि. रायगड) गावात सुरु असलेल्या साकवाचे**
**काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(१७) ११५०० (१०-०८-२०२०). श्री.महेंद्र थोरवे (कर्जत) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पोशीर (ता.कर्जत, जि.रायगड) गावात सुरु असलेल्या साकवाचे काम निकृष्ट दर्जाचे करण्यात येत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी रायगड जिल्हा परिषदेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्याकडे माहे जुन, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने या निकृष्ट पुलाच्या कामाची चौकशी न करता संबधित कंत्राटदाराला पाठीशी घालण्याचे काम या अभियंत्याकडून करण्यात येत असल्याने लाखो रूपयांच्या निधीचा अपव्यय होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, त्यानुसार सदर पुलाचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या कंत्राटदार व विभागाच्या संबंधित अधिका-यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१५-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे
(२) नाही, हे खरे नाही.
(३) सदर काम कनिष्ठ अभियंता व ग्रामस्थ, सरपंच यांचे देखरेखीखाली सुरू होऊन यशस्वीरीत्या पुर्ण करण्यात आले आहे. सदर कामास उप अभियंता, बांधकाम, रायगड जिल्हा परिषद, बांधकाम, उप विभाग कर्जत यांनी वेळोवेळी भेटी दिल्या असून वापरलेल्या साहित्याचे शासकिय प्रयोगशाळेत तपासणी करुन समाधानकारक असल्याचे खात्री केली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पिंपरी-चिंचवड शहरालगतच्या सात गावांचा महानगरपालिका क्षेत्रात समावेश करण्याबाबत**

**(१८) ११६२५ (१७-०९-२०२०). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रा लगतच्या हिंजवडी, मान, मारुंजी, गहुंजे, नेरे, सांगवडे, जांबे या ग्रामपंचायती निधीअभावी सार्वजनिक सेवा सुविधा देण्यास असमर्थ ठरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भागातील नागरिकांना मोठ्या प्रमाणावर कचरा पाणीपुरवठा रस्ते पथदिवे त्यांच्या प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ग्रामपंचायतीची वाढती लोकसंख्या पाहता सदर ग्रामपंचायतींना पायाभूत सुविधा पुरविताना मोठ्या प्रमाणावर अपयश येत असल्याने नागरिकांमध्ये असंतोषाची भावना निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने नगरविकास विभागाकडे हिंजवडी, मान, मारुंजी, गहुंजे, नेरे, सांगवडे जांबे या पिंपरी चिंचवड महानगरपालिका शहरालगत असलेल्या गावांचा महानगरपालिकेत समावेश करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीकरिता प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर ग्रामपंचायतीचा पिंपरी चिंचवड शहरात समावेश करण्याबाबत चिंचवड, लोकप्रतीनिधी यांनी लेखी पत्राद्वारे मा.मुख्यमंत्री यांच्याकडे माहे मे, २०२० च्या शेवटच्या आठवड्यात लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर सात गावांचा पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात समावेश करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१५-१२-२०२१) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

ग्रामपंचायतींना त्यांना प्राप्त होणारे स्व-उत्पन्न, १५ वा वित्त आयोग, शासनाकडून विविध योजनेंतर्गत मिळणारे लाभ त्याचबरोबर जिल्हा परिषद व पंचायत समिती यांच्याकडून मिळणारा निधी या निधीतून सार्वजनिक सोयी सुविधा पुरविण्यात येत आहेत. तथापि सदर गावातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करता सोयीसुविधा पुरविण्यावर मर्यादा येत आहेत.

(४) होय, हे खरे आहे. प्रश्नामधील नमूद गावांसह एकूण ११ गावांचा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत समावेश करण्याबाबतचा प्रस्ताव नगर विकास विभागाकडे प्राप्त आहे.

(५) या गावांचा पिंपरी चिंचवड मनपामध्ये समाविष्ट करण्याबाबत मा. श्री. लक्ष्मण जगताप, वि.स.स. यांचे दि. ४.३.२०२० रोजीचे मुख्यमंत्री महोदयांना लिहिलेले पत्र नगर विकास विभागाकडे प्राप्त झालेले आहे.

(६) या गावांचा समावेश पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात करण्याबाबतचा प्रस्ताव नगर विकास विभागाकडे प्राप्त असून नगर विकास विभागाच्या स्तरावर प्रस्तावाची तपासणी करण्यात येत आहे

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पोलीसांना मालकी हक्काची घरे मिळण्याबाबत**

**(१९) ११८५० (१३-०९-२०२०). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तत्कालीन शासनाने पोलीसांना मालकी हक्काची घरे देण्याबाबत घोषणा करूनही त्याची अद्यापपर्यंत अंमलबजावणी करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नेहरु नगर, कुर्ला (पुर्व) मुंबई येथील म्हाडाच्या भाडेतत्वावर घेतलेल्या इमारती या कालबाह्य झालेल्या असल्यामुळे त्यांची पुनर्बांधणी करणे आवश्यक असून त्याकरिता उक्त वसाहतीतील पोलिस कर्मचाऱ्यांनी सप्ततारा सोसायटी (नियोजित) स्थापन केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर संस्था शासनाचा एकही पैसा न घेता स्वखर्चाने १९ इमारतीमधील ५६० सदनिका शासनाने ठरवून दिलेल्या सक्वेअर फुट प्रमाणे नविन बांधुन पोलीस आयुक्त मुंबई यांचे ताब्यात देण्यास तयार असुन यामध्ये नेहरु नगर पोलीस ठाणे, मुंबई, १+१ मिटींग हॉलसह बांधुन देणे, तसेच नेहरु नगर पोलीस हॉस्पिटल १० बेडसह बांधुन देणे अशा प्रकारे एक अतिशय उत्कृष्ट प्रतिचा प्रोजेक्ट तयार करण्यात आलेला असुन त्याबाबत सर्व प्रस्ताव शासनाच्या संबंधित विभागास सादर केलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पोलीसांना मालकी हक्काची घरे मिळावीत यासाठी उक्त प्रस्तावास शासनाने मंजूरी दिली आहे काय वा त्यानुषंगाने सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१५-१२-२०२१) :**(१) नाही. हे खरे नाही.

शासनाने दि.१०/०४/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये पोलीस कर्मचारी यांना स्वत:ची घरे विकत घेण्यासाठी बँकांमार्फत कर्ज व्यवस्था करण्यासंदर्भात आदेश निर्गमित केला आहे. त्यानुषंगाने महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण महामंडळामार्फत बँकाकडून कर्ज घेऊन पोलीस कर्मचाऱ्यांना रु.९१५.४१ कोटी कर्ज शासकीय घरबांधणी अग्रीम दराने उपलब्ध करुन दिलेले आहे.

(२) व (३) होय. अशी रितसर परवानगी न घेता बेकायदेशीररित्या गृहनिर्माण संस्था स्थापन झाली असल्याचे समजते, परंतु त्यास शासन मान्यता व पोलीस आयुक्त, मुंबई यांचे ना-हरकत प्रमाणपत्र नाही. बृहन्मुंबई पोलीस दलाच्या वाढत्या मनुष्यबळाचा विचार करता, शासकीय सेवा निवासस्थानांची कमतरता असल्याने नेहरुनगर, कुर्ला (पूर्व), मुंबई येथील एकूण १९ इमारतीमधील ५८० सदनिका म्हाडाकडून विकत घेतल्या आहेत.

(४) शासनाने दि.१०/०४/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये पोलीस कर्मचारी यांना स्वत:ची घरे विकत घेण्यासाठी बँकांमार्फत कर्ज व्यवस्था करण्यासंदर्भात आदेश निर्गमित केला आहे. सेवा निवासस्थानांचा पुनर्विकास केल्यानंतर पुनर्विकासापूर्वी तेथे राहत असलेल्या पोलीसांना तेथेच मालकी तत्वावर कायमस्वरुपी निवासस्थाने देण्याची तरतूद महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९९२, आणि मुंबई पोलीस नियमावली १९९९, यात नाही. सेवा निवासस्थानांच्या पुनर्विकासानंतर पोलीसांना कायमस्वरुपी मालकी तत्वावर निवासस्थान देण्याचे शासनाचे धोरण नाही.

---

**अहेरी व एटापल्ली (जि.गडचिरोली) तालुक्यातील ग्रामसभेचे पदाधिकारी व कंत्राटदार यांनी नियमबाह्य तेंदूपत्त्याची विक्री केल्याबाबत**

**(२०) ११९५६ (१३-०९-२०२०). श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहेरी व एटापल्ली (जि.गडचिरोली) तालुक्यातील ग्रामसभेचे पदाधिकारी व कंत्राटदार यांनी संगनमत करुन वर्तमान पत्रात जाहीरात न देता गोपनीय पध्दतीने तेंदूपत्त्याचे भाव ठरवून तेंदूपत्त्याची विक्री करत असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नियमबाह्य पध्दतीने ठराविक कंत्राटदाराला तेंदूपत्ता संकलनाचे काम दिल्यामुळे कंत्राटदाराने तेंदूपत्त्याची अत्यंत कमी किंमत दिलेली असल्याने ग्रामसभेला लाखो रुपयांचे नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वृत्तपत्रात जाहीरात न देता नियमबाह्य लिलाव प्रक्रिया केल्याने इतर जिल्ह्यातील ग्रामसभेत सुध्दा लिलावाशिवाय तेंदूपत्ता विक्री करण्याचे प्रकार वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नियमबाह्य तेंदूपत्ता लिलाव करण्याऱ्या ग्रामसभेचे पदाधिकारी व कंत्राटदार यांच्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (१६-१२-२०२१) :** (१) हे अंशतः खरे आहे.
कोविड-१९ या विषाणूच्या प्रादुर्भावामुळे ग्रामसभा घेण्यास प्रतिबंध करण्यात आला होता. सबब, ग्रामस्थांच्या हितासाठी, त्यांच्या रोजगारासाठी ग्रामसभांनी स्वतः निर्णय घेऊन लिलाव प्रक्रिया केली व तेंदूपत्त्याची विक्री करण्यात आली आहे.

(२) नाही, हे खरे नाही.
सदर ग्रामसभांना तेंदूपत्ताचे सन २०१९ पेक्षा सन २०२० मध्ये प्राप्त दर जास्त आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करणेबाबत**

**(२१) १२४०३ (११-०९-२०२०). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामपंचायत कर्मचारी करवसुली, पाणीपुरवठा, शासनाच्या विविध योजना नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे काम अल्प वेतनात करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१५-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.
ग्रामपंचायत कर्मचारी यांना शासनाने निर्धारित केलेले किमान वेतन नियमितपणे त्यांच्या बँक खात्यात जमा केले जाते.
(२) सुधारित किमान वेतन दर ग्रामपंचायत कर्मचारी यांना लागू करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही प्रगतीत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भुसकरवाडी (ता.जिंतूर, जि. परभणी) येथील गावातील अंतर्गत रस्ते व मुख्य रस्त्याला जोडणारे जोड रस्ते बांधण्याबाबत**

**(२२) १३४६१ (११-०९-२०२०). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भुसकरवाडी (ता.जिंतूर, जि.परभणी) येथील गावातील अंतर्गत रस्ते व मुख्य रस्त्याला जोडणारे जोड रस्ते अद्याप नसल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गावातील ग्रामस्थांनी अंतर्गत रस्ते व जोड रस्त्यांच्या बांधकामाची मागणीकडे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गावातील अंतर्गत रस्ते व जोड रस्ते तात्काळ बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. हसन मुश्रीफ (१५-१२-२०२१) :** (१) होय हे खरे आहे.
(२) अशी बाब नाही.
सदर गावातील ग्रामस्थांनी दि.२०.९.२०१९ रोजीच्या पत्रान्वये तहसीलदार, ता. जिंतूर यांच्याकडे रस्ता बांधकामाची मागणी केली आहे. सदर ग्रा.मा. क्र. १९ ची लांबी ५.५० किमी आहे. सदरचा संपूर्ण रस्ता वन विभागाच्या जमिनीतून जातो. सदर रस्त्याच्या दुरुस्तीसाठी वन विभागाकडे परवानगी मागण्यात आली असून अद्याप परवानगी मिळालेली नाही. वन विभागाची परवानगी मिळाल्यावर सदर रस्त्याची दुरूस्ती करणे शक्य आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून ग्रामीण भागातील रस्त्याची कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(२३) १३५३८ (११-०९-२०२०). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील न जोडलेल्या वाड्या - वस्त्या जोडण्यासाठी व ग्रामीण भागातील दुरवस्था झालेल्या रस्त्यांची दर्जोन्नती करण्यासाठी राज्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेबाबत दिनांक २८ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू योजनेस सन २०१९-२०२० या कालावधीत पुरेसा निधी न मिळाल्याने मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून ग्रामीण भागातील रस्त्याची कामे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व तद्नुसार उक्त योजनेस निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१५-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत सन २०१९-२०२० मध्ये राज्य निधी व नाबार्ड कर्ज या लेखाशीर्षांतर्गत रू.२१६४.५० कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला होता. सदर अर्थसंकल्पीत केलेल्या निधीपैकी वित्त विभागाने रू.१२९८.७० कोटी इतका निधी उपलब्ध करून दिला होता. तसेच जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत रू.१२५३.२१ कोटी इतका अतिरिक्त निधी उपलब्ध झाल्याने सदर योजनेंतर्गत उपलब्ध झालेला एकुण रू.२५५१.९१ कोटी इतका निधी संबंधित अंमलबजावणी यंत्रणांना वितरित करण्यात आलेला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे घाडगेवाडी (ता.खानापूर, जि, सांगली) व अन्य काही गावामध्ये नवीन ग्रामपंचायत स्थापन करणेबाबत**

**(२४) १३६२७ (१०-०९-२०२०). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे घाडगेवाडी (ता.खानापूर,जि,सांगली) व अन्य काही गावांनी नवीन ग्रामपंचायत स्थापन करण्याचा प्रस्ताव/मागणी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नवीन ग्रामपंचायत स्थापन झाल्यास नागरिकांच्या अडचणी सोडविण्यात मदत होईल, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०९-१२-२०२१) :** (१), (२) व (३) ग्रामपंचायत कुर्ली, ता. खानापूर मधून घाडगेवाडी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणेबाबतचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांच्या दि. ३१.०८.२०१५ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला होता.

तथापि, स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या निकषानुसार किमान २००० लोकसंख्या असणे आवश्यक आहे व दोन गावामध्ये ३ कि. मी. पेक्षा जास्त अंतर असेल तर किमान १००० लोकसंख्या असणे आवश्यक आहे. सध्या घाडगेवाडी वसाहतीची लोकसंख्या ४८९ आहे. त्यामुळे निकषाची पूर्तता होत नसल्याने घाडगेवाडी येथे स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करता येत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यातील 'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचे प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी प्रलंबीत असल्याबाबत**

**(२५) १३६९६ (१६-०७-२०२०). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्र विकास योजने अंतर्गत विविध तालुक्यातून जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडे 'ब' वर्ग तीर्थक्षेत्र स्थळाचा दर्जा व विकासकामासाठी २४ प्रस्ताव प्राप्त झाले असून सदरचे प्रस्ताव बांधकाम विभागामार्फत दर्जा व विकासकामाच्या मान्यतेसाठी सन २०१७ ते २०१९ या काळात शासनाकडे सादर केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिपूर्ण प्रस्तावापैकी सन २०१७ ते २०१९ दरम्यान यातील एकही प्रस्ताव मंजूर झाला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावास मान्यता देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१४-१२-२०२१) :** (१) अंशत:खरे आहे. जिल्हा परिषद, अमरावती यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार सन २०१७ ते २०१९ या कालावधीत शासनास एकूण ३६ प्रस्ताव सादर केले आहेत.

(२) हे खरे नाही. सन २०१७ ते २०१९ या कालावधीत शासनाने एकूण १४ परिपूर्ण प्रस्तावांना ब वर्ग दर्जा दिला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई (जि.पालघर) तालुक्यातील ग्रामीण भागात करोनाचे रूग्ण आढळून येणा-या रूग्णांना रूग्णवाहीका पुरविण्याबाबत**

**(२६) १४४२७ (१५-०९-२०२०). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) तालुक्यातील अनुक्रमे अर्नाळा, कळंब, वनगांव टेम्भी, कोल्हापूर, वासलई, खोचिवडे, पाणजू, चंद्रपाडा, नागले, टीवरी, पोमन, खार्डी, भाताणे, डोंगरी, तिल्हेर, मेढे या ठिकाणच्या ग्रामीण भागात कोरोनाचे रूग्णांना उपचारासाठी रुग्णालयात नेण्यासाठी रूग्णवाहीका नसल्याने रूग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे जुलै, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे हे काय,

(२) तसेच, दिनांक १५ मार्च, २०२० ते १५ जून, २०२० या तीन महिन्याच्या कालावधीमध्ये भाड्याने घेतलेल्या रूग्णवाहिकाचे देयके अदा करण्यात आले नसल्याने ती ही सुविधा बंद झाल्याने रूग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोरोना बाधीत रुग्णांना तातडीने रुग्णालयात दाखल करणेसाठी खासगी रुग्णवाहिका ताब्यात घेण्यासंबंधीच्या निर्णयानुसार पालघर जिल्ह्यात तत्संबंधीची अधिग्रहित करण्याची कार्यवाही सुरु केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, तालुकानिहाय आतापर्यंत किती खाजगी रुग्णवाहिका, स्वयंसेवी संस्थाच्या इ. वाहने ताब्यात घेण्यात आली व अधिग्रहित ताब्यात घेण्यात आलेल्या रुग्णवाहिकांचे दर कसे निश्चित करण्यात आले आहेत,
(५) असल्यास, या प्रकरणी अधिग्रहित केलेल्या रुग्णवाहिकांचा वापर प्रत्यक्षात सुरु करण्यात आलेला आहे का व त्यासंबंधी स्थानिक जनतेस कोणत्या प्रकाराने माहिती देण्यात आली आहे ?

**श्री. राजेश टोपे (१४-१२-२०२१) : (**१) हे अंशत: खरे आहे
जुलै, २०२० मध्ये वसई तालुक्यात रुग्ण संख्या वाढल्याने काही काळ रुग्णवाहिकेची अडचण भासली तथापि, जिल्हाधिकारी कार्यालयाकडून २ रुग्णवाहिका उपलब्ध करुन दिल्यानंतर ही अडचण दूर झाली.
(२) हे खरे नाही
(३) हे खरे आहे
(४) पालघर जिल्हयात कोविड १९ अंतर्गत रुग्णांना आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्याकरीता खालील प्रमाणे रुग्णवाहिका अधिग्रहित करण्यात आल्या आहेत.

| अ.क्र. | तालुका | अधिग्रहित केलेल्या खाजगी / स्वंयसेवी संस्थेच्या रुग्णवाहिकेची संख्या | शासकीय रुग्णवाहिकेची संख्या |
|---|---|---|---|
| १ | जव्हार | २ | १ |
| २ | तलासरी | ३ | ० |
| ३ | विक्रमगड | ५ | ० |
| ४ | पालघर | ६ | ३ |
| ५ | डहाणू | ३ | १ |
| ६ | वाडा | ४ | ० |
| ७ | मोखाडा | २ | ० |
| ८ | वसई | २ | ४ |
| | एकूण | २७ | ९ |

प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या प्राधिकरण दरानुसार रुग्णवाहिकांचे दर निश्चित करण्यात आले आहेत.
उपलब्ध करण्यात आलेल्या रुग्णवाहिकांबाबत आरोग्य कर्मचारी तसेच आशा कार्यकर्त्यांमार्फत स्थानिक जनतेला माहिती दिली जाते.

## सेवानिवृत्त झालेल्या पोलिस अधिकारी व कर्मचारी यांना आरोग्य कुटुंब योजनेचा लाभ देण्याबाबत

**(२७) १४४५३ (१३-०९-२०२०). श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेवानिवृत्त झालेल्या पोलिस अधिकारी व कर्मचारी (अंमलदार) यांच्यासाठी सेवेत कार्यरत पोलिस अधिकारी व कर्मचारी (अंमलदार) यांच्याप्रमाणे आरोग्य कुटुंब योजना मंजूर करण्यात आली आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचा लाभ किती सेवानिवृत्त पोलिस अधिकारी व कर्मचारी (अंमलदार) यांना मिळाला आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१०-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

शासन निर्णय, गृह विभाग, दिनांक २८.०७.२००६ मधील परिच्छेद क्र. ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य पोलीस दलातील सेवानिवृत्त, मृत्यू, बडतर्फी इ. कारणांमुळे सेवेतून मुक्त झालेले अधिकारी/ कर्मचारी यांची नावे लाभार्थी यादीतून कमी करण्यात यावी, असे नमूद आहे, त्यामुळे सेवानिवृत्त पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेचा लाभ अनुज्ञेय नाही. तथापि, पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उप निरीक्षक दर्जापर्यंतच्या सेवा निवृत्त पोलीस कर्मचा-यांना महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ मिळण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या कार्यवाहीधीन आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कुडाळ (जि. सिंधुदुर्ग) तालुक्यातील हुमरस ग्रामपंचायतीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(२८) १४४८५ (११-०९-२०२०). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडाळ (जि. सिंधुदुर्ग) तालुक्यातील हुमरस ग्रामपंचायत मध्ये सन २००६ ते २००७ व सन २०१४ ते २०१६ या आर्थिक वर्षात झालेल्या अपहाराबाबत विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्याकडे श्री. एकनाथ परब यांनी कारवाईची मागणी केली सदर मागणीच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, सिंधुदुर्ग यांना चौकशीचे निर्देश विभागीय आयुक्ताने माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विभागीय आयुक्त यांचे निर्देश असताना देखील संबंधित ग्रामपंचायत अधिकारी व सदस्य यांच्यावर अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार ग्रामपंचायत अधिकारी व सदस्य यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०९-१२-२०२१) :** (१) होय ,हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) होय, चौकशी करण्यात आली आहे.
सदर प्रकरणी अपहार कालावधी मधील ग्रामपंचायत सदस्यांचा कालावधी संपल्याने त्यांचेवर कार्यवाही प्रस्तावित करता येत नाही. मात्र, तत्कालीन संबंधित ग्रामसेवक यांचेकडून अपहारित रक्कमेची वसुली १) सन २००६-०७ या आर्थिक वर्षातील रु. १,७३,०२६/- करणेबाबतची कार्यवाही जिल्हा परिषदेकडून सुरु आहे व २) सन २०१५-१६ या वर्षातील रु.१२,१९५ /- वसूल करून ग्रामनिधीमध्ये जमा करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ग्रामपंचायत कर्मचा-यांचे थकित वेतन अदा करून नियमित वेतन दरमहा प्रदान करणेबाबत**

**(२९) १४४९४ (११-०९-२०२०). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रामपंचायत कर्मचा-यांचे मागील ४ महिन्यांचे थकित वेतन अदा करून नियमित वेतन दरमहा प्रदान करण्याबाबत वि.स.स. बल्लारपूर यांनी ग्रामविकास मंत्री यांना दिनांक २७ जुलै २०२० रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१६-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) ग्रामपंचायतचे कर्मचारी यांना शासनाने निर्धारित केलेले किमान वेतन राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान, पुणे यांचे मार्फत नियमितपणे त्यांच्या बँक खात्यात जमा केले जाते .
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लासुर स्टेशन व वाळूंज एमआयडीसी (ता.गांगपूर, जि.औरंगाबाद) येथे पोलीस स्टेशन निर्मिती करण्याबाबत**

**(३०) १४८६४ (२६-०२-२०२१). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लासुर स्टेशन व वाळूंज एमआयडीसी (ता.गांगपूर, जि.औरंगाबाद) येथे सन २०११- २०१२ या कालावधीत पोलीस स्टेशन निर्मिती करण्याबाबत पत्र दिले असून शासनाने १२/१३/प्र.क्र.१ पोल ३ गृह विभाग दिनांक ०४ जानेवारी, २०१३ तर पोलिस महसंचालक यांचे पत्र क्र.२६-अ/४७ /औरंगाबाद लासुर १४६ दिनांक १६ जानेवारी, २०११ रोजी वा त्यासुमारास पत्रव्यवहार झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लासुर स्टेशन व वाळूंज एमआयडीसी या परिसरात गुन्हेगारीचे प्रमाण वाढलेले असल्यामुळे पोलीस स्टेशन आवश्यक असून सदरहू पोलीस स्टेशन निर्मितीबाबत प्रस्ताव वेळोवेळी मंत्री स्तरावर मान्यतेसाठी सादर करुनही अद्याप कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू पोलीस स्टेशनला मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (०७-१२-२०२१) :** (१), (२), (३)

पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण यांचे कार्यक्षेत्रात लासूर पोलीस ठाणे व वाळूंज एमआयडीसी पोलिस ठाणे निर्माण करणेबाबतचा पोलीस महासंचालक कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला असता, वित्त विभाग,शासन निर्णय दि.०४.०५.२०२० मधील सूचना विचारात घेता सदर प्रस्ताव सन २०२०-२१ मधे विचारात न घेता पुढील आर्थिक वर्षात आवश्यकतेनुसार प्रस्ताव फेर सादर करण्याबाबतचे अभिप्राय दिले होते.

त्यानुषंगाने पोलीस अधीक्षक, औरंगाबाद (ग्रामीण) यांच्या आस्थापनेवर प्रस्तावित लासूर पोलीस स्टेशनकरीता नव्याने नेमकी किती पदे निर्माण करावयाची आहेत, त्यापैकी काही पदे इतर कार्यालयाकडून वर्ग करून घेता येणे शक्य आहे का? इत्यादीबाबतची तपासणी करून, आवश्यकतेनुसार सुधारित प्रस्ताव सादर करणेबाबत पोलीस महासंचालक कार्यालयास दि.२५/१०/२०२१ च्या पत्राव्दारे कळविण्यात आले आहे.

वरीलप्रमाणे सुधारित प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर, याबाबत उचित ती कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विसापूर (ता.बल्लारपूर, जि.चंद्रपूर) येथील ग्रामपंचायत इमारतीचे बांधकाम प्रलंबित असल्याबाबत

**(३१) १६०९७ (२१-११-२०२०). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बल्लारपूर (जि.चंद्रपूर) तालुक्यातील विसापूर येथील ग्रामपंचायत इमारतीच्या बांधकामासाठी १ कोटी रूपये निधी मंजूर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निधी मंजूर असतानाही ग्रामपंचायत इमारतीच्या बांधकामास अद्याप सुरूवात झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर ग्रामपंचायत इमारतीचे बांधकाम तात्काळ करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच सदर इमारतीचे बांधकाम केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१५-१२-२०२१) :** (१) होय, सन २०१८-१९ या वित्तीय वर्षात शासन निर्णय क्र./२०१९/प्र.क्र.२०/भाग-९ ओ-६ बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, मुंबई दिनांक ०५/०३/२०१९ अन्वये मा. लोक प्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत मुलभुत सुविधा पुरविणे अंतर्गत रु. १००.०० लक्ष निधी मंजुर करण्यात आलेले आहे.
(२) होय, हे खरे आहे.

(३) ग्रामपंचायत इमारत बांधकामाचे प्रस्तावित जागेवर यापुर्वी एकुण २ इमारती होत्या. त्यापैकी एक इमारत मार्च, २०२० मध्ये पाडण्यात आली व एका इमारतीमध्ये विदर्भ कोकण ग्रामीण बँक कार्यरत होती. सदर काम मंजुर झाल्याने माहे जानेवारी, २०२० मध्ये ग्रामपंचायत विसापुर कार्यालयाची इमारत खाली करण्याची सुचना नोटीस देउनसुद्धा त्यांनी इमारत माहे ऑक्टोबर, २०२० ला पुर्णपणे खाली केली. ती इमारत माहे नोव्हेंबर, २०२० मध्ये पुर्णपणे पाडण्यात आली आहे. व बांधकामाकरीता जागा पुर्णपणे खाली करण्यात आलेली असून त्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग विभाग क्र.२ बल्लारपूर यांना काम सुरू करण्याबाबत निर्देशित करण्यात आलेले.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कणकवली (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील वाघेरी मठखुर्द या ग्रुप ग्रामपंचायती अंतर्गत वाघेरी व लिंगेश्वर या दोन गावांसाठी असलेल्या नळपाणी पुरवठाबाबत**

**(३२) १६४७६ (२१-११-२०२०). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कणकवली (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील वाघेरी मठखुर्द या ग्रुप ग्रामपंचायती अंतर्गत वाघेरी व लिंगेश्वर या दोन गावांसाठी असलेल्या नळपाणी पुरवठा दुरुस्तीची कामे करुन दिनांक ४ जुन, २०१६ रोजी वा त्यासुमारास उक्त योजना ग्रामपंचायतीकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या दुरुस्तीच्या कामात झालेली अनियमिततेची चौकशी करुन तत्कालीन पालकमंत्री यांनी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने समितीने चौकशी करुन शाखा अभियंता, उपअभियंता व वाघेरी ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामसेवक यांच्यावर कारवाई करावी असा अहवाल दिनांक १५ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास सहाय्यक आयुक्त (चौकशी), विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग, नवी मुंबई यांना दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अहवालाच्या अनुषंगाने शासनाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१५-१२-२०२१) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) मा. सहाय्यक आयुक्त चौकशी विभागीय आयुक्त, नवीमुंबई यांच्या दि.२५.१०.२०२१ रोजीच्या चौकशी अहवालानुसार संबंधित शाखा अभियंता/उप अभियंता यांचेवर दोषारोप सिध्द होत नसल्याचा निर्णय देण्यात आला आहे. श्री.संतोष बाजीराव राणे, सरपंच ग्रामपंचायत वाघेरी यांना विभागीय आयुक्त, कोकण भवन कोकण विभाग, मुंबई यांच्या दि.२२.१०.२०२१ च्या आदेशान्वये सरपंच पदाच्या अधिकार पदावरुन तसेच सदस्य पदावरुन काढून टाकले आहे. सदर प्रकरणी श्री.संतोष राणे यांनी विभागीय आयुक्त कोकण विभाग यांच्या निर्णयाविरुध्द म.ग्रा.अधिनियम १९५८ च्या कलम ३९ (३) खाली अपील दाखल केले अहे. तसेच सबंधित वाघोरी ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक श्री.यशवंत तांबे यांचेवर प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गैरव्यवहार करणाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यास शासनाकडून होत असलेल्या दिरंगाईबाबत**

**(३३) २०३३९ (३०-०३-२०२१). श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक २७ ऑक्टोबर, २०२० ते २ नोव्हेंबर, २०२० या कालावधीत लाचखोरी विरोधात दक्षता जनजागृती सप्ताह राबविण्यात आला असुन त्या अनुषंगाने गैरव्यवहार करताना कोणी आढळून आल्यास एसीबी शी संपर्क साधण्याचे आवाहन राज्य शासनाने केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाचखोरीच्या कारवाईत अडकलेल्यांवर निलंबनाची कारवाई करण्यास शासनाकडून दुर्लक्ष व दिरंगाई होत असल्यामुळे राज्यात सुमारे २२३ लाचखोर अजूनही कर्तव्यावर हजर आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१३ ते आतापर्यंत लाचखोरी प्रकरणी कारवाई होऊनही २२३ लाचखोरांचे निलंबन करण्यात आलेले नसून नांदेड परिक्षेत्रातील ५५, नागपूर परिक्षेत्रातील ५१, महसूल / नोंदणी / भूमि अभिलेख विभागातील ३०, ग्रामविकास विभागातील ४८, शिक्षण व क्रीडा विभागातील ४६, सहकार व पणन व वस्त्रोद्योग विभागातील १५, पोलीस, होमगार्ड आणि कारागृह विभागातील १० व अन्य विभागातील प्रत्येकी १ ते ४ जणांचा समावेश आहे, हे ही ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन उक्त २२३ लाचखोरांवर निलंबनाची कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२६-११-२०२१) :** (१) होय

(२), (३) व (४) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कारवाईमध्ये दोषी आढळलेल्या लोकसेवकांना संबंधीत प्रशासकीय विभागामार्फत निलंबित करण्यात येत असते. अशा एकूण २२३ लोकसेवकांपैकी अद्यापही निलंबित न केलेल्या लोकसेवकांबाबत तातडीने आढावा घेऊन निलंबनाबाबतचा योग्य तो निर्णय घेण्याच्या सुचना मा.मुख्य सचिव यांनी दि.१.१०.२०२१ रोजीच्या बैठकीत सर्व विभागांना दिल्या आहेत. त्यानुसार संबंधित प्रशासकीय विभागामार्फत कार्यवाही सुरु आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून प्राप्त माहितीनुसार, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कारवाईमध्ये दोषी आढळलेल्या परंतु निलंबित न केलेल्या २२३ लोकसेवकांपैकी नांदेड परिक्षेत्रात ५३, नागपूर परिक्षेत्रात ५१, महसूल नोंदणी/भूमी-अभिलेख विभागाशी संबंधीत ३०, ग्रामविकास विभागाशी संबंधीत ४८, शिक्षण व क्रीडा विभागाशी संबंधीत ४६, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाशी संबंधीत १५, तसेच पोलीस, होमगार्ड आणि कारागृह विभागातील १० लोकसेवकांचा त्यात समावेश आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या सापळा कारवाईत अडकलेल्या लोकसेवकांविरुध्द संबंधित विभागाच्या सक्षम प्राधिकाऱ्यांमार्फत कार्यवाही करण्यात येते. या अनुषंगाने वेळोवेळी मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात येऊन अशा प्रकरणांचा आढावा घेतला जातो. तसेच अशा लोकसेवकांच्या निलंबनाबाबत योग्य तो निर्णय घेण्याच्या सुचना देण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पोलिस दप्तरी औद्योगिक परिसरात चोरी करणाऱ्या अट्टल गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई करणेबाबत

**(३४) २०३५० (२८-०१-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) औद्योगिक वसाहत परिसरात मोठ्या प्रमाणावर सातत्याने चोऱ्या होत असल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्या असून पिंपरी-चिंचवड लघुउद्योजक संघटनेच्यावतीने औद्योगिक परिसरातील वाढत्या गुन्हेगारीवर प्रतिबंध घालण्याबाबत व औद्योगिक वसाहतीतील चोऱ्यांचा तपास करण्याबाबत निवेदन देण्यात आल्याचे माहे नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिंपरी-चिंचवड औद्योगिक परिसरातील तळवडे, सोनवणे वस्ती, कुदळवाडी, चिखली, शांतीनगर, प्राधिकरण भाग ७ ते १० एमआयडीसी, भोसरी, पिंपरी-चिंचवड परिसरात सुरक्षारक्षकाला शस्त्राचा धाक दाखवून चोरी करण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणावर होत असून औद्योगिक परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झालेले चोरांचे छायाचित्र देऊनही चोर आणि चोरीच्या मालाचा तपास लागत नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे का ?

(३) तसेच औद्योगिक वसाहत परिसरातील महिला कामगारांच्या सोनसाखळी चोरीच्या व छेडछाडीच्या घटनांमधेही वाढ झाल्याचेही निवेदनात म्हटले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चोरी करणाऱ्या गुन्हेगारांवर कारवाई करून चोरींच्या घटना न घडण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१६-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सुरक्षा रक्षकाला शस्त्राचा धाक दाखवून चोरी करण्याचे प्रकार तसेच औद्योगिक परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांत कैद झालेल्या चोरांचे छायाचित्र देवूनही चोर आणि चोरीच्या मालाचा तपास लागत नसल्याचे अशा प्रकारचे गुन्हे सन २०२० मध्ये घडलेले नाहीत.

(३) सन २०२० मध्ये पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील औद्यागिक वसाहत परिसरात चेन चोरी तसेच महिला छेडछाडीचे गुन्हे दाखल नाहीत.

तसेच या व्यतिरिक्त पिंपरी चिंचवड औद्योगिक परिसरातील सन २०२० मधील इतर प्रकारच्या चोरीचे गुन्हयांची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | गुन्हयांची वर्गवारी | दाखल | उघड |
|---|---|---|---|
| १ | भादंवि ३७९ | ४२२ | १३८ |
| २ | भादंवि ३८० | २३० | ८५ |
| ३ | भादंवि ३८१ | १८ | १७ |

(४) पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे परिसरात पोलीस ठाणे कार्यक्षत्रातील औद्यागिक वसाहत परिसरात खालीलप्रमाणे कारवाई व उपायायोजना करण्यात आली आहे.

१. २३ अट्टल गुन्होगारांवर तडीपारीची कारवाई करण्यात आली आहे.

२. औद्यागिक वसाहत परिसरात सातत्याने पेट्रोलिग ठेवली जाते.

३. गुरुवारी त्यापरिसरातील कंपन्यांना सुट्टी असल्याने बुधवार व गुरुवारी पेट्रोलिंग तसेच नाकाबंदी आयोजित केली जाते.

४. हद्दीतील इंडस्ट्रीयल असोशिएशनचे मदतीने कंपन्यांना वेळोवेळी भेटी देवून त्यांचे तक्रारीचे निरसन केले जाते.

५. पिपरी चिंचवड घटका अंतर्गत इंडस्ट्रीयल सेल कार्यन्वित असून सदर सेलव्दारे उपद्रवींवर कारवाई केली जाते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात पोलिस अँथॉरीटी कम्प्लेंट सेल कार्यान्वीत करण्याबाबत

**(३५) २०३५४ (२८-०१-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सामान्य नागरिकांना पोलीस ठाण्यात अनेकदा न्याय मिळत नसल्याने या संदर्भात नागरिकांना तक्रार करण्यासाठी राज्य शासनाने जिल्हा पातळीवर “पोलिस अँथॉरीटी कम्प्लेंट सेल” स्थापन करण्याचा शासन निर्णय दि.२५.७.२००८ रोजी जारी करुनही अद्याप जिल्हा स्तरावर “पोलिस अँथॉरीटी कम्प्लेंट सेल” स्थापन केले नसल्याचा प्रकार दि.०९.१०.२०२० रोजी निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलिस अँथॉरीटी कम्प्लेंट सेल स्थापन करण्यास १४ वर्षे विलंब होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, किती कालावधीत शासनातर्फे जिल्हा स्तरावर “पोलिस अँथॉरीटी कम्प्लेंट सेल कार्यान्वीत करण्यात येणार आहे तसेच मुंबईत कार्यरत असलेल्या महाराष्ट्र पोलीस तक्रार प्राधिकरणात अद्याप पर्यंत किती तक्रार अर्ज प्राप्त झाल्या आहेत व त्यापैकी किती प्रकरणात प्राधिकरणाने दोषी पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करुन अर्जदारास न्याय मिळवून दिला आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१६-१२-२०२१) :**(१) व (२) शासनाने मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ मध्ये सुधारणा केली असून महाराष्ट्र पोलीस(सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अधिनियम, २०१४, दिनांक २५.०६.२०१४ रोजी प्रसिध्द केला असून तो दि.०१.०२.२०१४ रोजी अंमलात आला आहे. त्यानुसार राज्यस्तरावर एक राज्य पोलीस तक्रार प्राधिकरण व सहा प्रादेशिक विभागांसाठी ६ विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण स्थापित करण्याची तरतूद करण्यात आली असून, २५.०७.२००८ रोजीचे आदेश निरसित झाले आहेत.

(३) विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरणावर अध्यक्ष व सदस्यांच्या नियुक्त्या दिनांक १३ एप्रिल, २०१७ व १५ एप्रिल, २०१७ च्या अधिसूचनेद्वारे करण्यात आल्या होत्या. विभागीय स्तरावर पुणे व नाशिक येथे नेमणुक केलेले सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश यांनी कार्यभार स्विकारल्याने कामकाज सूरू झाले होते. तथापि, पुणे विभाग व नाशिक विभाग वगळता नवी मुंबई (कोकण) विभाग, औरंगाबाद विभाग, अमरावती व नागपूर विभाग येथे अध्यक्ष या पदी नेमणुक केलेले सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश हजर न झाल्याने कार्यान्वित होऊ शकले नाहीत.

तसेच, सहा विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या नेमणूकीबाबत दि. १८.०८.२०२१ च्या अधिसूचनेद्वारे कार्यवाही करण्यात आली आहे.

राज्य पातळीवर राज्य पोलीस तक्रार प्राधिकरणाचे कामकाज दिनांक २.१.२०१७ पासून सुरू झाले.तसेच, राज्य पोलीस तक्रार प्राधिकरण येथे नेमणूक केलेले अध्यक्षांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या पदावर मा.उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश यांची नेमणूक दिनांक २६.२.२०२० च्या अधिसूचनेद्वारे, व विशेष पोलीस महानिरिक्षक दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल असा नियत वयोमानाने सेवानिवृत्त झालेला पोलीस अधिकारी यांची नेमणुक दि. २८.०७.२०२१च्या अधिसूचनेद्वारे करण्यात आली आहे. “सदस्य- नागरी समाजातील मान्यवर व्यक्ती” यांची नियुक्ती संदर्भात जाहिरात देण्यात आली आहे व राज्य शासनाच्या सचिव दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला एक निवृत्त अधिकारी यांची नेमणूक करण्याबाबत कार्यवाही सूरू आहे.

राज्य प्राधिकरणाशी संबंधित प्राप्त तक्रारी २१५९ अर्जापैकी निकाली काढण्यात आलेले २०३८ प्रकरणामध्ये प्राथमिक चौकशीत २२ प्रकरणात दोषसिध्दी झालेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्राथमिक आरोग्य केंद्रांना रुग्णवाहिका उपलब्ध करण्याबाबत.**

**(३६) २७१०९ (२४-०३-२०२१). श्री.आशुतोष काळे (कोपरगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोपरगाव (जि.अहमदनगर) मतदारसंघात सहा प्राथमिक आरोग्य केंद्र आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आरोग्य केंद्रात अत्यवस्थ रुग्णांना उपचारासाठी रुग्णांच्या नातेवाईकांना खाजगी वाहनाचा उपयोग करावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुग्णांची तसेच त्यांच्या नातेवाईकांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रांना स्वतंत्र रुग्णवाहिका उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (१४-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे

(२) हे खरे नाही

(३) अहमदनगर जिल्हयामध्ये कार्यरत असलेल्या ९७ प्राथमिक आरोग्य केंद्रापैकी ९७ ठिकाणी स्वतंत्र रुग्णवाहिका उपलब्ध आहे. तसेच सदरील रुग्णवाहिकेवर ईनिविदेद्वारे कंत्राटी पध्दतीने सर्व ठिकाणी वाहनचालकाची नेमणुक करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तौक्ते चक्रीवादळाच्या तडाख्यामुळे पी-३०५ तराफा समुद्रात बुडून ६० जणांच्या झालेल्या मृत्युबाबत**

**(३७) २७४०५ (०९-०६-२०२१). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री प्रशांत रामशेठ ठाकूर, श्री. संजय मुकूंद केळकर, श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर),श्री. आर.तामिल सेल्वन, ॲड.राहुल नार्वेकर (कुलाबा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तौक्ते चक्रीवादळाच्या तडाख्यामुळे पी-३०५ तराफा व वरप्रदा नौकेवरील अनेक कर्मचारी समुद्रात बुडून ६० जणांचा मृत्यु झाला असून २६ जण बेपत्ता असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ओएनजीसीसह उत्खनन करणारी अफकॉन्सद कंपनी तसेच तराफा चालक डर्मस्ट यांच्याकडून एकमेकांवर जबाबदारी ढकलली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी कॅप्टन राकेश बल्लावसह अन्य आरोपींविरुध्द यलोगेट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, सदर चौकशीनुसार दोषी असणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१५-१२-२०२१) :** (१) होय,

यलोगेट पोलीस ठाणेस करण्यात आलेल्या नोंदीनुसार अरबी समुदात मुंबई पासून ४० नॉटीकल मैलावर तौक्ते चक्रीवादळाच्या तडाख्यामुळे पापा-३०५ तराफा समुद्रात बुडून ७१ जणांचे मृतदेह मिळून आले असून उर्वरित सहा कर्मचारी यांचा शोध घेण्याचे काम प्रगतीपथावर चालू आहे.

(२), (३) व (४) पापा शिपिंग कंपनीचे संचालक व संबंधित कर्मचारी ओशियन डायव्हिंग सेंटरचे संचालक आणि ॲफकॉन्स प्रा.लि. कंपनीतील संबंधिताविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत तसेच यलोगेट पोलीस ठाणे येथील गु.र.क्र.२१/२०२१ भा.दं.वि कलम ३०४(२), ३३८, ३४ अन्वये कॅप्टन राकेश बल्लवसह अन्य आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी न्यायालयीन कार्यवाही सुरु असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबईत कोरोनाचा बनावट नकारात्मक अहवाल देणाऱ्या दोषींविरुद्ध कारवाई करण्याबाबत**

**(३८) २७९६७ (१७-०६-२०२१). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईत गुन्हे शाखेच्या पोलिसांनी कोरोनाचा बनावट नकारात्मक अहवाल देणाऱ्या साजित उपाध्ये, अनिकेत दुधावडे, राहुल पांडे या तिघांना दिनांक १० मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रबाळे येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील (एम.आय.डी.सी.) प्रवीण इंडस्ट्रीज कंपनीतील सुमारे १३३ कामगारांना बनावट नकारात्मक अहवाल माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदरहू प्रयोग शाळेच्या मालकाने आतापर्यंत किती रुग्णांना नकारात्मक अहवाल दिल्याचे व किती रुपयांची नफेखोरी केल्याचे तपासात उघड झाले आहे,
(४) असल्यास, त्यानुषंगाने संबंधित दोषींविरुद्ध कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१६-१२-२०२१) :** (१) होय,
खारघर पोलीस ठाणे येथे गुन्हा क्र.१६४/२०२१ भा.द.वि. कलम ४२०,४६५, ३४ नुसार गुन्हा नोंद असून आरोपी साजित उपाध्ये, अनिकेत दुधावडे, राहुल पांडे या तिघांना दिनांक ०७.०५.२०२१ रोजी अटक केली आहे.
(२) होय,
नवी मुंबई आयुक्तालयाकडील रबाले एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे गुन्हा क्र. १०२/२०२१, भा.द.वि. कलम ४१८, ४२०, ४६५, ४६८, ४७०, ४७१, ५००, १८८, २६९, ३४ अन्वये दिनांक १४.०४.२०२१ रोजी दाखल आहे.
(३) नमुद गुन्हयाचे तपासामध्ये गुन्हयाव्यतिरिक्त इतर रुग्णांना नकारात्मक अहवाल दिल्याचे आढळुन आले नाही व तशी तक्रार प्राप्त झालेली नाही.
(४) रबाले एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल असून ०३ आरोपींना अटक करुन दोषारोप मा.न्यायालयात दाखल करण्यात आले आहे. सध्या सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**धडगांव (जि.नंदूरबार) येथील बिजरी ते मांडवी रस्त्याचे कामाबाबत.**

**(३९) २८३६९ (१२-०६-२०२१). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ता.धडगांव (जि.नंदूरबार) येथील बिजरी ते मांडवी या मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत करण्यात येत असलेल्या रस्त्याचे काम गत पाच वर्षापासून अपूर्ण आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्याच्या कामावर किती रक्कम खर्च करण्यात आली आहे, सदर रस्त्याचे काम पूर्ण करणेसाठी १८ महिन्यांचा कालावधी अपेक्षित असतांना सन २०१६ पासून हे काम अद्याप अपूर्ण असल्याची सर्वसाधारण कारणे कोणती आहेत,
(३) सद्य:स्थितीत अपूर्णावस्थेत असलेल्या या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे आहे, हे ही खरे आहे काय?
(४) सदर रस्त्याचे काम मुदतीत पूर्ण केले नाही म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाने संबंधितांवर कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (१५-१२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत नंदूरबार जिल्ह्यातील पॅ.क्र.NDR-०६ मधील बिजरी-शिरसानी-वावी ते मांडवी ता.अक्राणी या कामाची निविदा रक्कम रू.६६८.९४ लक्ष इतकी असून सदर कामावर रू.५७९.२० लक्ष इतका खर्च झालेला आहे. स्थानिक अडचणींमुळे सदर काम मूळ मुदतीत पुर्ण करता आले नाही. तथापि, सद्यस्थितीत सदर काम ९६% पुर्ण झालेले असून उर्वरित काम लवकरात लवकर पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) हे खरे नाही.

सदर रस्त्याच्या कामावर ३ राज्य गुणवत्ता निरीक्षक व १ वरिष्ठ राज्य गुणवत्ता यांच्या नियतकालीक तपासण्या झाल्या असून तपासणीअंती समाधानकारक शेरे प्राप्त झालेले आहेत.

(४) सदर काम मुळ मुदतीत पुर्ण न झाल्याने मक्तेदारास रू.६६.९० लक्ष इतका (कामास लावता येणारा अधिकतम) दंड आकारण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील क्रीडा प्रबोधिनीत खेळाडुंसाठी शासनाच्यावतीने दरवर्षी देण्यात येणारा निधी खर्च न झाल्याबाबत

**(४०) २८३९४ (१७-०६-२०२१). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) क्रीडा व युवक सेवा संचालनालय आणि शासनाच्यावतीने राज्यातील क्रीडा प्रबोधिनीत खेळाडुंसाठी दरवर्षी दिला जाणारा तब्बल १ कोटी ७५ हजार रुपयांचा निधी खेळाडुंना न देता खर्च न झाल्याचे कारण देत राज्य शासनाकडे परत पाठविला असल्याचे दिनांक १६ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोणत्याच खेळाडूला शासनाच्यावतीने त्यांच्या बँकेच्या खात्यात पैसे पाठवून देण्यात आलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खेळाडूंना निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार (१३-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे सन २०२०-२०२१ मध्ये संपूर्ण वर्ष व सन २०२१-२२ मध्ये ऑक्टोबर पर्यत क्रीडा प्रबोधिनी बंद असल्याने खेळाडूंना प्रत्यक्ष खेळांचे प्रशिक्षण देण्यात आलेले नाही. कोविडच्या अपवादात्मक परिस्थितीत खेळ बंद असल्यामुळे त्याच्याशी संबंधित रक्कम खर्च झाली नाही.

(३) प्रबोधिनींमध्ये प्रवेशित निवासी व अनिवासी प्रशिक्षणार्थीच्या बॅक खात्यात रक्कम जमा करण्याबाबत तपासणी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येळगांव शिवार (जि.बुलढाणा) येथील गट क्रमांक ४३८ मध्ये अनधिकृत बांधकाम करण्यात येत असल्याबाबत**

**(४१) २८८०८ (१५-०६-२०२१). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येळगांव शिवार (जि.बुलढाणा) येथील गट क्रमांक ४३८ मध्ये निवासी क्षेत्रात (झोनमध्ये) २२८ फूट लांब ५४ फूट रूंद इतक्या आकारमानाचे होंडाई या कंपनीच्या शोरुमचे बांधकाम व्यावसायिक कारणास्तव येळगाव ग्रामपंचायतीच्या परवानगीविना सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शोरुमच्या अवैध बांधकामामुळे गट क्रमांक ४३८ मधील ९ मीटर लांबीचा रस्ताही बंद करण्यात आला असून नागरिकांना या ठिकाणी ये-जा करण्यास अवैधरित्या मज्जाव करण्यात येत असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यस, सदरहू शोरुमचे बांधकाम करताना या परिसरातील दोन जुन्या वृक्षांची तोड करण्यात आली असून या शोरुमच्या सुरु असलेल्या बांधकामामुळे आणखी चार ते पाच वृक्षांचे नुकसान होणार असतानाही याकडे स्थानिक प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या परिसरात कला महाविद्यालय, बुलढाणा यांनी गेल्या १० वर्षात वृक्षांची लागवड करुन त्यांचे आजवर संगोपन करीत असल्यामुळे वृक्षसंपदेच्या या अवैध तोडीविरुध्द कारवाई करण्याकरिता तहसिलदार, बुलढाणा यांना माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने सदरहू अनधिकृत बांधकाम निष्कासित करुन या बांधकामाकरिता वृक्षसंपदेची तोड करणाऱ्यांविरुध्द सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याबाबत तसेच या अनधिकृत बांधकामाकडे हेतूपर्वक दुर्लक्ष करणारे आणि निवासी क्षेत्रातील जागेचा व्यावसायिक कारणासाठी वापर करण्यास परवानगी देणारे संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१५-१२-२०२१) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) नाही, हे खरे नाही.

(४) होय, हे खरे आहे.

(५) सदर अनधिकृत बांधकामास ग्रामपंचायतीकडून अधिकृत परवानगी देण्यात आलेली नसून तत्कालीन सरपंच व सचिव यांनी दि.२६.९.२०२० रोजी बांधकाम परवानगी देण्यास हरकत नसल्याचे प्रमाणपत्र दिले आहे. सबब, सदर अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत संबंधित होंडाई वर्कशापॅचे मालक श्री.कमलेश कोठारी यांना दिनांक २/७/२०२१ व १२/७/२०२१ रोजी ग्रामपंचायतीने नोटीसद्वारे कळविले असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

**राज्यात फौजदार ते पोलिस उपअधिक्षक दर्ज्यांच्या अधिकाऱ्यांच्या जागा रिक्त असल्याबाबत**

**(४२) २९०९२ (०९-०६-२०२१). श्री.टेकचंद सावरकर (कामठी), श्री.बंटी भांगडीया (चिमूर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात फौजदार ते पोलिस उपअधिक्षक दर्ज्यांच्या अधिकाऱ्यांच्या साडेचार हजार जागा रिक्त असून उक्त प्रकरणी खात्यांतर्गत पदोन्नती वेळेत न मिळाल्याने सदरहू जागा सातत्याने रिक्त राहत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोपनीय अहवाल ऑनलाईन पाहण्याची सुविधा असून पदोन्नती देण्याचे मार्गदर्शन तत्वे शासनाने ठरवून दिली असतानाही पोलिस अधिकाऱ्यांना वेळेत पदोन्नती दिली जात नसल्याचे तसेच पोलिस अधिका-यांसाठी शाश्वत समृद्धी योजना लागू असून दहा वर्षे सेवा झालेल्यांना त्या पदाचे वेतन दिले असले तरी पदोन्नती देण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (०८-१२-२०२१) :** (१) (२) व (३)

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दि.०७.०५.२०२१ नुसार पदोन्नती कोट्यातील सर्व रिक्त पदे भरण्याबाबत मंजूरी देण्यात आलेली आहे. पोलीस उप निरीक्षक गट-ब (अराजपत्रित संवर्गाची ३७६ पदे भरण्याबाबत दि.२८.१०.२०२१ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच पोलीस उपनिरिक्षक मर्यादित विभागीय परीक्षा-२०२१ करिता २५० पदांचे मागणीपत्र दि. ११.१०.२०२१ अन्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले आहे.) तसेच पोलीस उप अधिक्षक/ सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) या संदर्भातील पदोन्नती कोटयातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात कार्यरत असलेल्या बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्याबाबत.**

**(४३) २९१७९ (१५-०६-२०२१). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्री.चंद्रकांत जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कुठलेही वैद्यकीय शिक्षण न घेतलेल्या आणि नोंदणी नसलेले तब्बल ४० हजार बोगस डॉक्टर रुग्णांवर उपचार करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ॲलोपॅथी, आयुर्वेदिक, होमियोपॅथी आणि युनानी अशा पॅथीमध्ये शिक्षण घेतलेले आणि त्या त्या पॅथीच्या कौन्सिलकडे नोंदणी असलेल्या डॉक्टरांना व्यवसाय करण्याची परवानगी असून ज्या पॅथीमध्ये शिक्षण घेतले त्याच पॅथीमध्ये व्यवसाय करणेही बंधनकारक असुन हॉस्पिटल, क्लिनिक आणि दवाखान्यात डॉक्टरांनी आपले नोंदणी प्रमाणपत्र दर्शनी भागात लावणेही बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कारेगाव (ता.शिरुर) येथील महमूद शेख ही बारावी नापास असलेली व्यक्ती डॉ.महेश पाटील यांच्या नावाचे एम.बी.बी.एस. वैद्यकीय पदवीचे बनावट प्रमाणपत्र बनवून गेले दोन वर्षापासून मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल चालवीत असून त्यांनी बनावट आधार कार्ड आणि इतर बनावट कागदपत्रे बनवून डॉ. शीतल पडवी यांना हॉस्पीटलमध्ये भागीदारी करुन घेण्यासाठी त्यांच्याकडून १७ लाख ५० हजार रुपये देखील घेतले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार वैद्यकीय शिक्षण न घेतलेल्या बोगस डॉक्टरांवर व त्यांना सहकार्य करणा-या अधिका-यावर कारवाई करणेसह भविष्यात बोगस डॉक्टरांना आळा घालण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत
आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (१५-१२-२०२१) :** (१) नाही.

(२) होय.

(३) होय तथापि फसवणूकीची रक्कम रु. १५,५०,०००/- इतकी आहे.

(४) होय.

(५) याबाबत संबंधितावर रांजणगाव पोलीस स्टेशन येथे गु.र. क्र. १६२/२०२१, भा. द. वि. कलम ४२०, ४६७, ४६८, ४७१ सह महाराष्ट्र वैद्यकीय अधिनियम, १९६१ कलम ३३(२) अन्वये दिनांक-१२.०४.२०२१ रोजी गुन्हा नोंदवण्यात आला असून संबंधित आरोपीस अटक करण्यात आली आहे व आरोपीविरुद्ध मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्याची कारवाई पोलिसांकडून करण्यात येत आहे.

तसेच बोगस वैद्यकीय व्यावसायिकांवर आळा घालण्यासाठी व त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यासाठी वैद्यकीय शिक्षण विभागाच्या दि.०७.०२.२००२ च्या शासन निर्णयान्वये जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरावर समित्या गठित करण्यात आलेल्या आहेत. मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यांसाठी पोलिस आयुक्त बृहन्मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली दि.०४.१२.२००१ च्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली आहे. तसेच दि.०५.०९.१९९१ च्या शासन निर्णयान्वये तालुका स्तरीय, महानगरपालिका स्तरीय व नगरपरिषद स्तरीय समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. या समित्यांना व पोलीसांना बोगस वैद्यकीय व्यावसायिकांवर कारवाई करण्याबाबत दि. ०७.०२.२००० व दि.१९.०८.२००० च्या परिपत्रकान्वये सुचना देण्यात आल्या आहेत. या समित्या त्यांच्या कार्यक्षेत्रातील बोगस वैद्यकीय व्यावसायिकांचा आढावा घेऊन त्यांच्याविरुद्ध संबंधित न्यायालयात खटले दाखल करण्याची रितसर कारवाई पोलिसांमार्फत करतात.

६) प्रश्न उद्भवत नाही.

## उस्मानाबाद जिल्हयातील जिल्हा सामान्य रुग्णालयात रक्त तपासणीचे कंत्राट खाजगी संस्थेस दिल्याबाबत

**(४४) ३०१५४ (१५-०६-२०२१). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हायातील जिल्हा सामान्य रुग्णालयात रक्त तपासणीचे कंत्राट खाजगी संस्थेस दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रक्त तपासणी करणाऱ्या खाजगी संस्था रक्ताचे नमुने तीन ते चार दिवस उशीरा नेऊन अहवाल मिळण्यास देखील उशीर करत असल्यामुळे रुग्णांवर उपचार करण्यास विलंब होत असून परिणामी उपचारादरम्यान अनेक रुग्णांचा मृत्यू झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची चौकशी करुन या खाजगी संस्थेवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा कारण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (१४-१२-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे

जिल्हा सामान्य रुग्णालयातील काही चाचण्या करण्याचे कंत्राट या केंद्रशासन अंगीकृत एचएलएल संस्थेस देण्यात आले आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

रक्त नमुने घेण्यास उशिर होत नाही. काही चाचण्यांचा निष्कर्ष मिळण्यास कालावधी लागतो त्यामुळे अहवाल उशिरा मिळतात. तथापि उपचारा अभावी मृत्यू झाल्याचे आढळून आले नाही.

(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## राज्यातील शासकीय कार्यालयांमध्ये दोन लाखांहून पदे रिक्त असल्याबाबत .

**(४५) ३२२३४ (०२-०९-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय कार्यालयातील पदे मागील दोन-तीन वर्षात कोरोना लॉकडाऊन आणि इतर कारणांमुळे भरण्यात आलेली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाच्या शासकीय कार्यालयांमध्ये दोन लाखांहून पदे रिक्त असल्याची बाब माहे जून, २०२१ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी सुशिक्षित बेरोजगारांकडून रिक्त पदे भरण्याबाबत वारंवार मागणी होत आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (०८-१२-२०२१) :** (१) हे अंशतः खरे आहे. मागील दोन वर्षांमध्ये सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग तसेच इतर अत्यावश्यक सेवा वगळता अन्य विभागांमधील पदे भरण्यावर निर्बंध होते.

(२) माहे डिसेंबर, २०१९ अखेरच्या उपलब्ध आकडेवारीनुसार शासकीय कार्यालयांमधील गट अ, ब, क व ड या संवर्गातील पदोन्नती व सरळसेवेची मिळून एकूण ७,३४,७५६ पदांपैकी अंदाजे १,५३,२३१ इतकी पदे रिक्त आहेत.

(३) हे खरे आहे.

(४) वित्त विभागाच्या दि.१६.०५.२०१८ च्या शासन निर्णयान्वये व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयान्वये शेतकऱ्यांना सुविधा पुरविण्यासाठी महत्त्वाच्या सेवेशी निगडित असलेली रिक्त पदे भरण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.

सर्व प्रशासकीय विभागांना त्यांच्या (खुद्द) व त्यांच्या नियंत्रणाखालील कार्यालयांच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारित आकृतीबंधास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेणे आवश्यक करण्यात आले असून, आढावा अंतिम झाल्यानंतरच रिक्त पदे भरावीत अशा सूचना दिल्या आहेत. तथापि विविध विभागांच्या पदांच्या अत्यावश्यकतेनुसार वित्त विभागाच्या दि. ९.६.२०१७ च्या शासन निर्णयान्वये गठित उपसमितीमार्फत मान्यता घेऊन रिक्त पदे भरण्यास परवानगी दिली जाते.

तसेच वित्त विभागाच्या दि. ३०.७.२०२१ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील १०० टक्के रिक्त पदे भरता यावीत याकरीता वित्त विभागाच्या विविध शासन निर्णयान्वये पदभरतीवर घातलेल्या निर्बंधांमधून सुट देण्यात आली आहे. त्यानुसार रिक्त पदे भरण्याची कार्यवाही संबंधित प्रशासकीय विभागांकडून करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तालुका कंधार (जि.नांदेड) येथील पंचायत समिती इमारतीचे बांधकाम करण्याबाबत

**(४६) ३२२६१ (०४-०८-२०२१). श्री.श्यामसुंदर शिंदे (लोहा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तालुका कंधार (जि.नांदेड) येथील कंधार पंचायत समितीची इमारत ही धोकादायक बनली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तिथे कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांच्या व कर्मचाऱ्यांच्या जिविताला धोका निर्माण झाला आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या इमारतीचे २० मार्च २०१९ मध्ये स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले असून ऑडिट रिपोर्ट मध्ये सदर इमारत अत्यंत जीर्ण झालेली असून धोकादायक बनलेले असल्याचे नमूद केले आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर इमारतीच्या नकाशाप्रमाणे जोते क्षेत्रफळ १०२०.३८ चौ. मी इतके प्रस्तावित केले आहे व अंदाजपत्रकीय किंमत ५००.०० लक्ष इतकी सादर केलेली आहे हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर बांधकाम पूर्ण होई पर्यंत कंधार पंचायत समिती कार्यालय इतर ठिकाणी हलविण्यात येणार आहे काय व इमारत निर्मितीकरिता शासनाकडून कोणती उपाययोजना करण्यात आलेली आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१५-१२-२०२१) :** (१)सदर इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट झालेले नसल्यामुळे इमारत धोकादायक असल्याचे सांगता येत नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील लाचलुचपत प्रतिबंध विभागाच्या सापळयात ८१४ शासकीय अधिकारी कर्मचारी आढळल्याबाबत**

**(४७) ३२२८३ (०५-०८-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील लाचलुचपत प्रतिबंध विभागाने जानेवारी २०२० ते डिसेंबर २०२० पर्यंत ५९६ सापळे रचले त्यात एकूण ८१४ अधिकारी-कर्मचारी आढळल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लाच देणे व घेणे कायद्याने गुन्हा असतानाही शासकीय वेतना व्यतिरिक्त लाच घेण्याचे प्रकार शासकीय कार्यालयात सुरु असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा प्रकारच्या वाढत्या गैरव्यवहाराला राज्यातील नागरिक वैतागले असून वाढत्या गैरव्यवहाराला आळा घालण्याची मागणी राज्यातील नागरिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अशा प्रकारच्या गैरव्यवहाराला आळा घालण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१४-१२-२०२१) :** (१) व २) होय हे खरे आहे.
माहे जानेवारी, २०२० ते डिसेंबर, २०२० या कालावधीत लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत करण्यात आलेल्या सापळा कारवाईचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

| कारवाई | कालावधी (जाने, २०२० ते डिसे.२०२०) | आरोपी लोकसेवकांची संख्या |
|---|---|---|
| सापळा | ६३० | ८६३ |

(३) व (४) राज्यातील गैरव्यवहाराला व लाचखोरीला आळा घालण्यासाठी/ रोखण्यासाठी तसेच जनजागृती करण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्यामार्फत खालील उपाययोजना राबविण्यात येत आहेत :-

१. लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत दिनांक २५/०२/२०१५ रोजी www.acbmaharashtra.net हे मोबाईल ॲप कार्यान्वित करण्यात आले असून, या ॲपवर लाचेची मागणी, अपसंपदा व इतर भ्रष्टाचारांच्या गुन्ह्याबाबत तक्रार केली जाऊ शकते.

२. राज्यातील जनतेला लाचखोरांविरुध्द तक्रार करणे सहज सोपे व्हावे म्हणून लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत टोल फ्री क्रमांक १०६४ ही हेल्पलाईन तसेच whatsapp no. ९९३०९९७७०० कार्यान्वित करण्यात आला आहे.

३. लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत Facebook वर www.facebook.com /MaharashtraACB ह्या नावाने अकाउंट असून ACB मार्फत करण्यात आलेल्या सापळा, अपसंपदा व इतर भ्रष्टाचाराच्या गुन्ह्यांबाबत माहिती देऊन जनजागृती केली जाते. तसेच Facebook वर देखील तक्रार केली जाऊ शकते.

४. लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत www.acbmaharashtra.gov.in ही वेबसाईट कार्यान्वित असून त्यावर ACB मार्फत करण्यात आलेल्या कारवाईची सर्व माहिती उपलब्ध करण्यात आली आहे. या वेबसाईट वरूनही लाचखोर शासकीय नोकरदारांविरुध्द तक्रार केली जाऊ शकते.

५. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कार्यपध्दतीबाबत FM radio, दूरदर्शन यावर परिसंवाद आयोजित करून जनजागृती करण्यात येते.

६. लाचलुचपत प्रतिबंधक विभागामधील अधिकारी व कर्मचारी हे नियमितपणे त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व कार्यालयांना भेटी देऊन ACB च्या कार्यपध्दती बाबत माहिती देतात. जनजागृती करतात.

७. लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत सर्व शासकीय कार्यालयांच्या दर्शनी भागावर ACB संबंधी फोन नंबर, हेल्पलाईन नंबर, वेबसाईट इत्यादीची माहिती फलक लाऊन प्रदर्शित करण्यात आली आहे.

८. जनजागृती करण्याकरिता सर्व शहरे व गावालगत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची माहिती असलेले पोस्टर्स, स्टिकर्स लावण्यात येतात.

९. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचा email id - acbwebmail@mahapolice.gov.in वर तसेच ब्युरोमधील कार्यरत पेरीक्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या mail id वर तक्रार केली जाऊ शकते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पिंपरी-चिंचवड व पुणे महानगरपालिकेच्या हद्‌दीतील नदीतील अतिक्रमणे दूर करणेबाबत

**(४८) ३२३४२ (०५-०८-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील पिंपरी चिंचवड व पुणे महानगरपालिका व पीएमआरडीए, महामेट्रो कार्यक्षेत्रात मुळा-मुठा, इंद्रायणी, पवना, राम नदी, देव नदी इत्यादी नद्या वाहतात तसेच पिंपरी-चिंचवड व पुणे मनपा हद्‌दीतील नद्यांची निळी आणि लाल पूररेषा आखणीचे नकाशे जलसंपदा विभागाकडून पुणे, पिंपरी चिंचवड मनपा , पीएमआरडीए , महामेट्रोला देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नद्यांच्या पात्रात अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे, तसेच मोठया प्रमाणात कचरा टाकण्यात येतअसून औंध बाणेर येथे राम नदी आणि मुळा नदी संगमाजवळ राम नदीचा प्रवाह दुसरीकडे वळविण्यात येऊन राम नदीपात्रात कचरा, मुरूम टाकण्यात आले असून नदी संकुचित करून वाळू उपसा होत असल्याच्या तक्रारीवर जीवित नदी संस्थेमार्फत जलसंपदा विभागाकडे करण्यात आली होती हे ही, खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर नद्यातील अतिक्रमणे अनधिकृत बांधकामे व कचरा यामुळे पर्यावरणाची हानी होऊन पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर नदी व त्यांच्या अंतर्गत नाल्यांना पूर येत असल्याने मोठ्या प्रमाणावर नागरिकांच्या मालमत्तेचे नुकसान होत असून राम नदीचा प्रवाह वळवणाऱ्या बांधकाम व्यवसायिकांवर काय कारवाई करण्यात आली आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहर जिल्हा आणि पिंपरी-चिंचवडमधील नद्यांच्या पात्रातील आणि अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे तसेच कचरा साफ करुन घेण्याचे आदेश जलसंपदा विभागाने पुणे पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाला पत्राद्वारे दिला आहे हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कारवाई करण्यात न आलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेवर एनजीटी राष्ट्रीय हरित लवादाच्या आदेशानुसार जलसंपदा विभागाच्या वतीने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. जयंत पाटील (०९-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

मुळा-मुठा इंद्रायणी, पवना, राम नदी, देव नदी इत्यादी नद्यांचे अंतिम केलेले पूररेषा नकाशे संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थेस हार्ड कॉपीव्दारे देण्यात आले असून जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळावर मंजुर पूररेषा नकाशे उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

जिवीत नदी संस्थेमार्फत दिनांक १७.०५.२०२१ रोजीचे पत्रान्वये राम नदीचा प्रवाह दुसरीकडे वळविणेबाबत नदीत राडारोडा टाकून पात्र संकूचित केलेबाबत व अनधिकृत वाळू उपसा बाबत तक्रार केली होती.

(३) जलसंपदा विभागाचे शासन निर्णय क्र. पुरनि-२०१८/(१८२/२४३/८९/सिंव्य.(महसूल), दि. ०३.०५.२०१८ अन्वये पुराचा संभाव्य धोका टाळण्यासाठी पुररेषेच्या आत कोणतेही बांधकाम न होण्याच्या दृष्टीने पुररेषेची आखणी करणे व निषिद्ध व नियंत्रित क्षेत्राचा उपयोग करण्याबाबत दिलेल्या मार्गदर्शक सुचनांचे अनुषंगाने स्थानिक स्वराज्य संस्थांनी बांधकाम परवानगी देऊन त्याबाबत नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

जीवीत नदी संस्थेमार्फत प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करणेबाबत पुणे महानगरपालिका/ पिंपरी चिंचवड महानगरपालिका /पुणे महानगर विकास प्राधीकरण, महाराष्ट्र मेट्रोरेल कार्पोरेशन लि. पुणे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, पुणे यांना कळविण्यात आले.

(४) होय, हे खरे आहे.

पावसाळ्याच्या पार्श्वभुमीवर पुणे शहर हद्दितील नदी पात्रातील अनाधिकृत बांधकामे/ अतिक्रमणे व पुररेषांमध्ये अनाधिकृतपणे टाकण्यात आलेल्या राडारोडा, मुरूम, माती व पाडलेल्या बांधकामांचे अवशेष इ. काढण्याकरिता पुणे महानगरपालिका/पिंपरी चिंचवड महानगरपालिका/ पुणे महानगर विकास प्राधीकरण/ महाराष्ट्र मेट्रोरेल कार्पोरेशन लि., पुणे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, पुणे यांना तातडीने कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आले आहे.

(५) मा. नॅशनल ग्रीन ट्रिब्युनल (NGT), वेर्स्टन झोन, पुणे बेंच कोर्टात चालु असलेली याचिका (OA) क्र. ४९/२०१९ चे अनुषंगाने दिनांक २६/०९/२०१९ रोजीचे सदर प्रकरणीचे सुनावणीवेळी मा. न्यायालयाने पुणे शहर हद्दितील अतिक्रमणे, राडारोडा, भराव इ. काढण्याबाबत पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पुणे महानगर विकास प्राधीकरण यांना आदेश दिलेले आहेत.

पूर परिस्थिती निर्माण होऊ नये म्हणून सदर अनाधिकृत बांधकामे व अतिक्रमणे इ. काढणेबाबत संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थेस जलसंपदा विभागामार्फत वेळोवेळी कळविण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत**

**(४९) ३२३७४ (०२-०९-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील लाखो उमेदवार स्पर्धा परीक्षांची तयारी करत असून तसेच रिक्त पदांचा आकडा वाढत असूनही शासनाकडून हि पदे भरण्यात आली नसल्याचे माहे जून, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापरीक्षा या संकेतस्थळाद्वारे ३५ हजार पदांची भरती प्रक्रिया अद्यापही पूर्ण झाली नसून रिक्त पदांची आकडेवारी तीन लाखांच्या घरात जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील बेरोजगार तरुणांची वाढती संख्या पाहता तरुणांचा विचार करता सदर पदभरती तातडीने सुरु करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (१७-१२-२०२१) :**(१) व (२) हे अंशतः खरे आहे. माहे डिसेंबर, २०१९ अखेरच्या उपलब्ध आकडेवारीनुसार शासकीय आणि जिल्हापरिषद कार्यालयांमधील गट अ, ब, क व ड या संवर्गातील अंदाजे २,००,१९३ इतकी पदे रिक्त आहेत. कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे अर्थव्यवस्थेवरील परिणाम व वित्तीय उपाययोजनांतर्गत नविन पदभरतीवर तात्पुरत्या कालावधीसाठी निर्बंध घातले आहेत.

(३) शेतकऱ्यांना आवश्यक नागरी सुविधा व ग्रामीण भागात आवश्यक त्या पायाभूत सुविधा पुरविण्याकरिता विविध विभागांतील सरळसेवेची रिक्त पदे भरण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच, विविध विभागांच्या पदांच्या आवश्यकतेनुसार रिक्त पदे भरण्यास दि. ९.६.२०१७ च्या शासन निर्णयान्वये गठित उपसमितीमार्फत मान्यता देण्यात येते. वित्त विभागाच्या दि. ३०.७.२०२१ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील १०० टक्के रिक्त पदे भरता यावीत याकरीता वित्त विभागाच्या विविध शासन निर्णयान्वये पदभरतीवर घातलेल्या निर्बंधांमधून सुट देण्यात आली आहे. त्यानुसार रिक्त पदे भरण्याची कार्यवाही संबंधित प्रशासकीय विभागांकडून करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंधेरी (पूर्व) येथील शासनाच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील सदनिकांचा अज्ञातांनी अनधिकृत ताबा घेतल्याबत

**(५०) ३२३९२ (२३-०८-२०२१). श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अंधेरी (पूर्व) मरोळ औद्योगिक क्षेत्रात झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत बांधण्यात आलेल्या इमारतीमधील ९९ सदनिकांचा अनधिकृतरित्या अज्ञात व्यक्तींनी ताबा घेतल्याची तक्रार उप अभियंता, मरोळ उपविभाग यांनी एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे, अंधेरी (पूर्व) यांच्याकडे केल्यानंतर गु. र. क्र.७५/२०२० भा. दं. वि. ३४१, ४४८ अन्वये गुन्हा नोंद केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे, अंधेरी (पूर्व) यांनी गुन्हा नोंद करून दीड वर्षाचा कालावधी उलटल्यानंतरही कोणतीही कारवाई न केल्यामुळे दिनांक १८ मार्च, २०२१ रोजी गृह, राज्यमंत्री यांनी बैठक घेऊन संबंधितांवर कारवाई करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१५-१२-२०२१) :** (१) होय.

(२) व (३) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी मरोळ विभागाचे उप अभियंता, यांनी एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे, अंधेरी (पूर्व) येथे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने ९९ अनोळखी इसम व त्यांना सहाय्य करणारे इतर यांचेविरुद्ध गु.र.क्र.७५/२०२० भा. दं. वि. ३४१, ४४८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास चालू आहे. सदर गुन्हात अद्याप अटक करण्यात आलेली नाही.

सदर प्रकरणाबाबत श्री. शेखर भोयर यांनी मा.राज्यमंत्री (गृह/शहरे) यांना केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने मा. राज्यमंत्री (गृह/शहरे) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १८/०३/२०२१ रोजी म्हाडा कार्यालय, बांद्रा येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत दाखल केलेल्या गुन्ह्याच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही प्राधान्याने करण्याबाबत मा. राज्यमंत्री (गृह/शहरे) यांनी तोंडी आदेश दिले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**

**मुंबई.** **प्रधान सचिव,**

**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.